
दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2024-2026
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● मंगळवार दि.९ जुलै २०२४ ● पाने ४ ● वर्ष ३९ ● अंक २४४ ● किंमत ३ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

## थोडक्यात



### बावळाट-दाणोली मार्गावर कोसळलेली दरड दूर

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

येथील बावळाट-दाणोली मार्गावर मोठी दरड कोसळल्यामुळे हा मार्ग वाहतुकीसाठी पूर्णतः बंद झाला होता. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर त्या ठिकाणी आपत्कालीन यंत्रणा तात्काळ धावली व त्यांनी रस्त्यावरची माती बाजूला करून रस्ता पूर्व सुरू केला. ही घटना आज सकाळी सरमळे संपतनाथ मंदिराच्या शेजारी एका वळणावर घडली होती. त्यामुळे सावंतवाडी शहरातून वाहतूक वळविण्यात आली आहे. याबाबतची माहिती तहसीलदार श्रीधर पाटील यांनी दिली. जिल्ह्यात पाऊस असल्यामुळे बऱ्या ठिकाणी पाणी साचले आहे. त्यामुळे योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



### अतिवृष्टीतील आपत्ती ग्रस्तांना ओरोस शिवसेनेच्या वतीने रातोरात मदतकार्य

**ओरोस । प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जिल्हामध्ये रविवारी मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली त्यामध्ये ठीक ठिकाणी पुरस्थिती उद्भवून नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरले.त्यामुळे लोकांची जेवण व राहण्याची मोठी गैरसोय निर्माण झाली. यावेळी अमित भोगले, रवी कदम, भगवान परब, मनीष पारकर व शिवसेना ओरोसच्या वतीने नागरिकांना राहण्याची व्यवथा तसेच अल्पोपहार, रात्री जेवणासह सह अंथरून पांघरुणाची रातोरात तत्काळ व्यवस्था करण्यात आली.

### पुरात अडकलेल्या दोन महिलांना ग्रामस्थांनी वाचविले

**सातार्डा । वार्ताहर**

मुसळधार पावसामुळे तेरेखोल खाडीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. तरी खाडी काठाच्या लोकांनी सावधगिरी बाळगावी. काम असेल तरच बाहेर पडा व सुरक्षित रहा, असे आवाहन सातार्डा सरपंच संदीप प्रभू यांनी केले आहे. सातार्डा-भटपावणी येथे रस्ता व पूल नसल्यामुळे ग्रामस्थांचे हाल होत आहेत. सतर्क ग्रामस्थां मुळे रविवारी पुराच्या पाण्यात अडकलेल्या दोघींचे प्राण वाचले आहेत. भटपावणीमध्ये पुराच्या पाण्यात ग्रामस्थांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. शासन दखल कधी घेणार? असा प्रश्न ग्रा. पं. सदस्या विनिता गोवेकर यांनी उपस्थित केला आहे. मनाली मनोज गोवेकर व दर्शना दत्ताराम गोवेकर या दोन महिलांना दोरी टाकून वाचविले.

सिंधुदुर्ग समाचार

दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg. samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com

# आचरा पारवाडी, कालावल नद्या धोक्याच्या कक्षेत

## काळसे बागवाडी येथे पुरस्थिती गंभीर ; मध्यरात्री अनेक घरांना पाण्याचा वेढा







**सिंधुदुर्ग । जिल्हाप्रतिनिधी**

मुसळधार पावसाने सिंधुदुर्गवासियांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. सकाळ पर्यंतच्या मागील २४ तासात सरासरी २१६ मिमी पाऊस कोसळला. सावंतवाडी तालुक्यात मुसळधार पावसाने अक्षरशः थैमान घातले. सरासरी २७० मिमी इतका पाऊस सावंतवाडीत लागला. सावंतवाडी आणि कुडाळ तालुक्यातील तेरेखोल तसेच कर्ली नदी दुथडी भरून वाहत आहेत. कुडाळ तालुक्यात ही दमदार पाऊस मागील २४ तासात लागला. पावशी आणि ओरोस येथे महामार्गावर पाणी आले होते. तर वेताळ बांबरडे गावात घरांना पाण्याचा वेढा पडला होता. काही बाजारपेठेत पाणी शिरले होते. आज ही ऑरेंज अलर्ट असून खबरदारी म्हणून एनडीआरएफचे एक पथक जिल्ह्यात बोलवण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व शाळांना आज सुट्टी ही देण्यात आली आहे. मात्र मध्यरात्री नंतर पावसाचा जोर ओसरला असून हलका हलका पाऊस पडत आहे. असे असले तरी अजून ही काही मार्ग पाण्याखाली असून सखल भागात पाण्याचा संचय तसाच आहे. कुडाळ शहरानजिक असलेल्या पावशी गावाला पुराच्या पाण्याने वेढा दिला आहे. या पुराच्या पाण्यात अडकलेल्या लोकांचे रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले आहे. यासाठी एनडीआरफची टीम मागवण्यात आली आहे.

या टीमसह कुडाळचे तहसीलदार विरसींग वसावे स्वत या बचावकार्यात उतरले आहेत. आतापर्यंत ४०० जणांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. काल झालेल्या मुसळधार पावसामुळे बांदा दाणोली या राज्य मार्गावर नदीचे पाणी आल्यामुळे रस्ता बंद झाला आहे. सकाळपासून ओसरत असतानाच सपतनाथ नजिक कॅाॅल पुलानाजिक डोंगराचा बराच भाग रस्त्यावर कोसळल्याने रस्ता पूर्णपणे बंद झाला आहे. सध्या हा मार्ग बंद झाल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या वाहन चालकांना पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

मालवण तालुक्यातील काळसे गावातील करणी नदीच्या पाणी पातळीमध्ये झपाट्याने वाढ झाल्यामुळे रात्री अडीच वाजताच्या सुमारास बाग वाढीला पुराच्या पाण्याने वेडा घातलेला पाहायला मिळाला. ऐन झोपेच्या वेळीच पुराच्या पाण्यामुळे काळसे बागवाडीतील नागरिकांची तारांबळ उडाली देखील पाहायला मिळाली. या पुराच्या पाण्यामध्ये अनेकांचा मोठा नुकसान झाले आहे. या पुराच्या पाण्यामध्ये शेतकऱ्यांची गुरे अजूनही पुराच्या पाण्यामध्ये अडकलेले आहेत. त्याचप्रमाणे कोकणातील प्रमुख भात शेती ही देखील पाण्याखाली गेली आहे. त्याचप्रमाणे तिथल्या स्थानिक नागरिकांना देखील सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे.

रविवार रात्री पासून मुसळधार पडणारया पावसामुळे आचरा पारवाडी,कालावल नद्या धोक्याच्या कक्षेत आल्या असून नदिलगतची घरांना धोका निर्माण झाला होता. मात्र सोमवार सकाळ नंतर पावसाने उसंत घेतल्या मुळे संभाव्य धोका टळला.याबाबत मंडल अधिकारी अजय परब तलाठी संतोष जाधव, पोलीस नाईक मनोज पुजारे यांनी पुरसदृश्य स्थिती भागात पहाणी करुन संबंधितांना सावधगिरी च्या सुचना दिल्या.

आचरा पारवाडी नदीच्या देवगड किनारया बाजूने मुळये यांच्या घराला नदीच्या पाण्याचा वेढा पडला होता. पारवाडी येथील केदार शिर्के,साळसकर आदींच्या घरालगत नदीचे पाणी आले होते. तर चिंदर लब्दे वाडीभागातही काही ठिकाणी अंगणात पाणी आल्याच्या घटना घडल्या होत्या.आता देवगड रस्त्यावर कावले हॉटेल लगतच्या नाल्यालापूर आल्याने रस्त्यावरुन पाणी वाहू लागल्याने वाहतूकीस

**पान ३ वर...**

# अतिवृष्टीमध्ये जामसंडे खाकशी वाडी येथे कोसळली पाऊलवाटेची संरक्षक भिंत

**देवगड । पांडूशेठ साटम**

देवगड तालुक्यात रविवार व सोमवारी पावसाने धुवाधार बॅटिंग केली आहे त्या ठिकाणी यामुळे ठिकठिकाणी पडझड होऊन वाहतुकीचा खोळंबा देखील झाला आहे. सोमवारी पहाटे तर पावसाने हाहाकारच माजविला ठिकठिकाणी रस्ते,मळेशेती माड बागायची पाण्याखाली गेल्या होत्या. देवगड तालुक्यातील जामसंडे खाकशीवाडी येथील विलास पेडणेकर यांच्या घरासमोरील चिरेबंदी घाटीची दरड कोसळून



नुकसान झाले आहे. सोमवारी पहाटे झालेल्या मुसळधार पावसामुळे ही घटना घडली. मात्र सुदैवाने कोणतीही जीवित हानी झालेली नाही. देवगड जामसंडे नगरपंचायत हद्दीमधील खाकशीवाडी येथील पेडणेकर घाटी या ठिकाणी नगरपंचायतीच्या वतीने बांधण्यात आलेल्या संरक्षक भिंतीचे चिरे कोसळून सोमवारी ८ जुलै रोजी पहाटे झालेल्या अतिवृष्टीमुळे कोसळली असून या संरक्षण भिंतीचे दगड

**पान ३ वर...**

# सरळ रेषेत डोंगर कापले जात असल्याने ही स्थिती निर्माण झाली असल्याचा स्थानिकांचा आरोप!

**पेडणे । वार्ताहर**

राष्ट्रीय महामार्ग ६६ धारगळ महाखाजान येथील दरड पंधरा दिवसाच्या अंतराने पुन्हा एकदा कोसळल्यामुळे कंत्राटदाराच्या कामाचा दर्जा दिसून आला आहे. दरम्यान, ११ जुलै रोजी केंद्रीय बांधकाम मंत्री नितीन गडकरी हे मोपा लिंक रस्त्याच्या उद्घाटन समारंभाला येणार आहे. त्यावेळी त्यांनी महामार्ग कामाची पाहणी करून संबंधित ठेकेदार कंपनीवर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक मागणी करत आहेत.



पत्रादेवी ते धारगळ महाखाजान पर्यंत रस्त्याचे कंत्राट एमव्हीआर या कंपनीला मिळाले आहे. महामार्गाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. या रस्त्याचे काम करत असताना अनेक समस्या उभ्या राहिल्यात. त्यासाठी वेळोवेळी स्थानिक पंचायती, नागरिक, सामाजिक कार्यकर्त्यांनी आवाज उठवला. सरकारला वेगवेगळ्या पद्धतीने निवेदने दिली. निवेदनाची दखल घेत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री, अधिकाऱ्यांनी वेळोवेळी या रस्त्याची पाहणी केली. ज्या समस्या असतील त्या सोडवल्या जातील अशी आश्वासने दिली. मात्र, निकृष्ट कामांवर प्रत्यक्षात कोणतीच कारवाई झाली नाही.

धारगळ महाखाजन येथे गेल्या पावसाळ्यात भली मोठी दरड कोसळली होती. त्यावेळी जीवितहानी झाली नाही. त्यावेळी एकेरी महामार्ग पूर्णपणे बंद केला होता. त्यानंतर मागच्या पंधरा दिवसापूर्वी या ठिकाणी दरड कोसळली. त्यानंतर ८ रोजी पुन्हा दुसऱ्यांदा या ठिकाणी दरड कोसळली

**पान ३ वर...**

# जुन्या आंबेरी पुलाला पडले भगदाड

**कुडाळ । प्रतिनिधी**

कुडाळ मालवणचे आमदार वैभव नाईक यांनी आंबेरी पुल मंजूर करून पूर्ण करून घेतले. मात्र सत्तांतर झाल्यानंतर पुलाच्या ॲप्रोचरोड साठी सत्ताधारी भाजपने निधी न दिल्याने जुन्या पुलावरून वाहतूक सुरु होती. मात्र रविवारी झालेल्या अतिवृष्टीत जुन्या आंबेरी पुलाला भगदाड पडले. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. आज आमदार वैभव नाईक यांनी त्याठिकाणी भेट देत पाहणी केली. नवीन पुलावरून वाहतूक सुरू करण्याची कार्यवाही न केल्याने तहसीलदार व

**पान ३ वर...**



# दापोलीत पाण्याने वेढा दिल्याने घरात अडकलेल्या सहा जणांना वाचवले

**दापोली । प्रतिनिधी**

तालुक्यात पावसाचा जोर कायम असून, अनेक ठिकाणी पडझडीच्या घटना घडल्या आहेत. बांधतिवरे येथे नदीला पूर आल्याने शेती पाण्याखाली गेली आहे. तालुक्यातील ताडील - कोंगळे येथे रस्त्यावर दरड कोसळली आहे.

टाळसुरे येथे रविवारी रात्री अचानक एका घराला पाण्याने वेढा दिल्याने घरातील सदस्य अडकून होते, त्यांना सुरक्षित



बाहेर काढण्यात आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला यश आले आहे. दोन-तीन दिवस दापोली तालुक्यात पावसाची संततधार कायम आहे. रविवारी खेम धरणात पोहण्यासाठी गेलेला एक मुलगा बेपत्ता असून, अजूनही त्याचा शोध सुरू आहे. रविवारी रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास मौजे टाळसुरे येथील मेडिकल कॉलेज

**पान ३ वर...**

# १० कोटी रुपये खर्च करून बांधलेल्या नवीन शासकीय विश्रामगृहाला गळती

**कणकवली । प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्फत कणकवली मधील नव्याने बांधलेल्या शासकीय विश्रामगृहाला पहिल्या पावसामध्ये गळती लागली आहे. दोन महिन्यांपूर्वी या शासकीय विश्रामगृहाचे उद्घाटन मोठा गाजावाजा करत सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले होते. दहा कोटी रुपये खर्च करून बांधलेल्या या विश्रामगृहाची अवस्था जर ही असेल तर



सिंधुदुर्ग मधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्वच कामांची अशी अवस्था असल्याचा आरोप आमदार वैभव नाईक यांनी केला. सार्वजनिक बांधकाम

**पान ३ वर...**

# नीटचा पेपर फुटल्याची केंद्र सरकारची पहिल्यांदाच सर्वोच्च न्यायालयात कबुली

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

नीटचा पेपर लीक झाला असल्याची कबुली पहिल्यांदाच केंद्र सरकारने दिली असून याप्रकरणी गुन्हा नोंद करून आरोपींनाही अटक केल्याचं सर्वोच्च न्यायालयात सांगितलं आहे. पेपरफुटीमध्ये ज्या विद्यार्थ्यांना फायदा झाला त्यांची ओळख पटली असल्याचंही केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सांगितलं आहे.

एकीकडे नीट पेपरफुटीचा तपास सीबीआयने सुरू केला असून दुसरीकडे या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. पेपर रद्द करण्याची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वकिलांनी युक्तिवाद करताना न्यायालयाला सांगितले की, ५ मे रोजी परीक्षा झाली होती आणि निकाल १४ जूनला जाहीर होणार होता. मात्र निकाल ४ जूनलाच जाहीर करण्यात आला. .

विद्यार्थ्यांच्या वतीने युक्तिवाद करताना वकिलांनी सांगितलं की, परीक्षेच्या एक दिवस आधी एका टेलिग्राम चॅनलवर नीट परीक्षेचा पेपर आणि त्याची उत्तरपत्रिकाही देण्यात आली होती. परीक्षा आयोजित करणाऱ्या एनटीएनेही काही विद्यार्थ्यांना चुकीचे पेपर मिळाल्याचे मान्य केले आहे. अशी अनेक प्रकरणे समोर आली ज्यात नीटचा पेपर लीक झाल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी पाटणा येथे एफआयआरही दाखल करण्यात आला आहे.

किती विद्यार्थ्यांना ग्रेस मार्क्स मिळाले?

वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, सुरुवातीला बिहार पोलिसांकडे उघड झालेल्या तथ्यांमुळे मोठ्या प्रमाणात पेपर लीक झाल्याची माहिती मिळते. या परीक्षेत ६७ मुलांनी ७२० पैकी ७२० गुण मिळवले. त्यापैकी ६ विद्यार्थी एकाच केंद्रातील होते. त्यावर न्यायालयाने यापैकी किती विद्यार्थी आहेत ज्यांना ग्रेस गुण मिळाले आहेत अशी विचारणा केली. त्यापैकी एकाही विद्यार्थ्याला ग्रेस गुण देण्यात आले नसल्याचं वकिलांनी सांगितलं.

दोन-तीनपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना पूर्ण गुण मिळाल्याचे इतिहासात यापूर्वी कधीही घडले नव्हते असे त्यांनी न्यायालयाला सांगितले. ६७ मुलांनी ७२० पैकी ७२० गुण मिळवण्याची ही इतिहासातील पहिलीच वेळ आहे. १५६३ मुलांना ग्रेस गुण देण्यात आले होते त्यापैकी ६ मुलांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले आहेत.

**कोणत्या पुराव्याच्या आधारे फेरतपासणीची मागणी?**

कोर्टाने प्रश्न विचारला की, तुमच्याकडे कोणते पुरावे आहेत ज्याच्या आधारे तुम्ही फेरतपासणीची मागणी करत आहात? यावर वकिलांनी युक्तिवाद केला की, जर सिस्टीमच्या पातळीवरच फसवणूक सिद्ध होत असेल, तर त्यामुळे संपूर्ण परीक्षेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. न्यायालयाने आधीच्या सुनावणीदरम्यान असेही म्हटले आहे की एकाही विद्यार्थ्याला चुकीच्या पद्धतीने किंवा अनियमिततेने प्रवेश घेता येणार नाही याची आम्ही खात्री करू. बिहार पोलिसांनी केलेल्या तपासातही ही संपूर्ण व्यवस्थेतील त्रुटी असल्याचे समोर आले आहे.

**एनटीए ने मान्य केले की पेपर लीक झाला?**

न्यायालयाच्या पुराव्यांबाबत वकिलांनी पुढे सांगितले की, एकीकडे एनटीए असे सांगत

**पान ३ वर...**

**सिंधुदुर्ग समाचार**
।। बुडती हे जण न देखवे डोळा! ।।

# लोकसभेच्या कामकाजात कोणी कुठेतरी बसून हस्तक्षेप करत आहे का?

ओम बिर्ला यांना पुन्हा लोकसभेचे अध्यक्ष बनवण्या मागे पंतप्रधानांचा एकच उद्देश होता: विरोधकांना शेवटच्या टोकापर्यंत अपमानित करणे! बिर्ला या पदासाठी कधीच पात्र नव्हते; आजही नाहीत. विद्वत्ता, कार्यकुशलता, चातुर्य, वक्तृत्व आणि सभागृहात सन्मानाचे वातावरण राखणे यापैकी कोणत्याही गुणांशी त्यांचा संबंध नाही हे आपण गेल्या पाच वर्षांत पाहिले आहे. विरोधकांनी त्यांचे स्वागत आणि स्तुती का केली ते कळत नाही!

ओम बिर्ला यांनी गेल्या संसदेत ज्या पद्धतीने विरोधकांना तुच्छ लेखले होते, त्याचीच पुनरावृत्ती करण्यासाठी, यावेळीही पंतप्रधानांनी त्यांना पुढे केले आहे, जेणेकरून विरोधकांना आणि देशाला काहीही बदललेले नाही हे समजावे. नव्या लोकसभेच्या पहिल्याच दिवशी ते त्यांच्या जुन्या अवतारात दिसले. ज्या असभ्यतेने त्यांनी दीपेंद्र हुड्डा यांचा अपमान केला; जय संविधान म्हणताना शशी थरूर यांचा पेच, विरोधी पक्षाच्या खासदारांना कधी उठायचे आणि कधी बसायचे हे शिकवणारे त्यांचे बोलणे - हे सगळे त्यांच्या कारवायांसाठी पुरेसे आहेत.

राहुल गांधींनी विचारले की माईक बंद का केला, यावर सभापतींनी उत्तर दिले की, माझ्याकडे माईकचे बटण नाही, अशी व्यवस्था मी आधीच केली आहे. सभापतींच्या माहितीशिवाय व परवानगीशिवाय लोकसभेच्या कामकाजात कोणी कुठेतरी बसून हस्तक्षेप करत आहे का? असे असेल तर मग अध्यक्षाची गरजच काय? बटण बंद करू शकणारी न दिसणारी व्यक्तीही लोकसभा चालवू शकते. माईक कोणी बंद केला, कोणाच्या परवानगीने किंवा निर्देशाने हे सांगितल्याशिवाय इंडिया अलायन्सने लोकसभेत किंवा राज्यसभेत जाऊ नये.

परंपरेचा विचार केला तर विरोधी पक्षनेत्यालाही परंपरा असतात हे समजून घ्यायला हवे. या सभापतींना त्या परंपरा माहीत नाहीत आणि विरोधी पक्षनेतेपदाचा अर्थही माहीत नाही. १० वर्षांपूर्वी जन्मलेल्या खासदारांसाठी ही शोकांतिका स्वाभाविक आहे. जेव्हापासून त्यांचे डोळे उघडले तेव्हापासून त्यांना लोकसभा म्हणजे फक्त एकच व्यक्ती हे दिसले आणि समजले. उदाहरणार्थ, जेव्हा सभापती उभे राहतात तेव्हा सर्व खासदारांनी खाली बसावे, अशी परंपरा आहे; पंतप्रधान बोलत असताना खासदारांनी त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकावे; तसेच विरोधी पक्षनेते बोलत असताना सभापतींनी त्यांना वारंवार अडवणे, वेळोवेळी आठवण करून देणे, काय बोलावे, काय बोलू नये आदी सूचना देणे चुकीचे आहे, अशी परंपरा आहे. हे असभ्य आहे आणि लोकशाही परंपरेचे उल्लंघन आहे.

शेवटी, परंपरा कशा तयार होतात आणि त्यांना बळ कुठून मिळते? कायदेशीर तरतुदींपेक्षा परंपरा अधिक वैध का आहेत? फक्त त्यांना कोणी तोडत नाही म्हणून. राज्यघटनेने दिलेले सामर्थ्यही त्याचे सभ्यतेने पालन करून ते अधिक मजबूत आणि प्रभावी बनवते. राष्ट्रगीत वाजत असताना राष्ट्रपतींसमोर तुफान धिंगाणा घालणारे लोकसभेचे अध्यक्ष असोत किंवा राष्ट्रगीत वाजत असताना खुर्चीवर बसलेले पंतप्रधान असोत, या सर्व कृती परंपरांना धक्का देतात.

नीटबाबत विरोधकांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे द्यायला आम्ही तयार आहोत, असे शिक्षणमंत्र्यांचे म्हणणे योग्यच होते. तो सांगत होता, पण त्याची देहबोली आणि वृत्ती दिसली की तुला जे करायचे ते करा, आम्ही काहीही चर्चा करणार नाही. कारण याच मंत्र्याने या नीटबद्दल सातत्याने सांगितले होते की, कोणतीही गळती नाही, घोटाळा नाही, सर्व काही विरोधकांनी केले आहे.

राहुल गांधींना ते आवडेल की नाही, त्यांची चाचपणी सुरू आहे. आज विरोधी पक्षनेतेपद हे वैभवाचे पद नाही. आज ही पोस्ट म्हणजे पर्याय निर्माण करण्याचे आव्हान देणारी पोस्ट आहे. पंडित जवाहरलाल यांच्या काळातील संसद परत आणण्याची ताकद त्यांच्यात आहे की नाही, हे त्यावेळच्या विरोधकांसमोरचे थेट आव्हान आहे. मी नेहरू संसद म्हणतेय कारण आम्ही तिथून प्रवास सुरू केला आणि सतत घसरत इथपर्यंत पोहोचलो. मग त्या कालावधीपेक्षा चांगली संसद व्हावी असे मी कसे म्हणू शकते?

ज्या प्रकारे राहुल गांधी आणि इंडिया कोलायशनने संविधानाचे पुस्तक दाखवून पंतप्रधानांना निवडणुकीत कमकुवत केले, त्याला प्रतिउत्तर म्हणून त्यांनी लोकसभा अध्यक्षांना प्यादे बनवून आणीबाणीचा निषेध करणारा ठराव मंजूर करून घेतला. ती जाहिरात त्याचा शर्ट माझ्यापेक्षा पांढरा कसा होईल? पण काँग्रेसला यामुळे नाराज होण्याची काय गरज होती? इंदिरा गांधी आणि काँग्रेस अध्यक्षांनी अनेकदा जाहीरपणे कबूल केलेल्या सुमारे ५० वर्षांपूर्वी झालेल्या चुकीची काँग्रेस आता तक्रार का करते? तो इतिहासाचा विषय झाला. १९७७ मध्ये अल्पायुषी असलेल्या जनता पक्षाच्या सरकारने अशी घटनात्मक व्यवस्था निर्माण केली होती की कोणत्याही सरकारला आणीबाणी लादणे जवळजवळ अशक्य होते हेही लक्षात घेतले पाहिजे.

हीच ती संसद आहे जिच्या शब्दांना आता किंमत नाही. कविता वाचल्या जात आहेत, म्हणींचीही पुनरावृत्ती होत आहेत, पंतप्रधानही महान विचारवंत आणि तत्त्ववेत्त्यांचे अवतरण सांगतात, पण ते सर्व इतके निष्प्रभ का होतात? कारण त्यांच्या मागे विश्वासार्हता नाही. अविश्वासू प्रवचन हे आत्माहीन सांगाड्यासारखे असते. ही लंगडी आणि अधोगती युतींची संसद आहे जी देश आणि लोकशाहीला लाजवेल तोपर्यंत ती आहे. विरोधी पक्षनेते आणि संपूर्ण विरोधी पक्षाने या संसदेत सुधारणा किंवा बदल व्हावा, असा दबाव सतत ठेवला पाहिजे.

# हाथरस दुर्घटना : प्रशासनाला जाब कोण विचारणार ?

हाथरस येथील दुर्घटनेनंतर संपूर्ण देशभरात मतम तांतराचा प्रवाह वेगाने वाहू लागला. स्वतःला पुरोगामी म्हणून घेणाऱ्या, नास्तिकतावादी विचारसरणीच्या विचारवंतांनी वर्तमानपत्रांतून पानभर लेख लिहून यामागे हिंदूंच्या अंधश्रद्धाच कशा कारणीभूत आहेत, भोळ्याभाबड्या हिंदूंना आधुनिक महाराज, बाबा कसे फसवत आहेत याची वेगवेगळी उदाहरणे देऊन वाचकांना ते पटवून देण्याचा प्रयत्न केला, कुणी या बाबा महाराजांची पाळेमुळे खणून काढण्याची मागणी केली, कुणी यांना सार्वजनिक कार्यक्रम करण्याची अनुमतीच देऊ नये अशी मागणी केली तर कुणी असले प्रकार थांबावे यासाठी राष्टीय स्तरावर अंधश्रद्धा निर्मूलन कायदा करण्याची आवश्यकता असल्याचे ठासून सांगितले. लोकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन त्यांना लुबाडणारे समाजात कैक आहेत; मात्र यासाठी सर्वच महाराजांच्या सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी आणण्याची मागणी कितपत योग्य आहे ? गर्दी, चेंगराचेंगरी या गोष्टी केवळ धार्मिक कार्यक्रमांतच होतात का ? भारताने टी-२० विश्वचषक जिंकल्याच्या निमित्ताने हल्लीच मुंबईतील मरिन ड्रॅइव्ह येथे काढण्यात आलेल्या परेडसाठी जमलेल्या लाखोंच्या जन समुदायामध्ये अनेकांना श्वास कोंडल्याचा, गुदमरण्याचा त्रास झाला होता. मुळात ज्या ठिकाणी गर्दी होते अशा ठिकाणी गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी पुरेशी सक्षम यंत्रणा कार्यान्वित असणे अत्यंत आवश्यक असते. आपल्याकडे या यंत्रणेचा अभाव वेळोवेळी दिसून येतो. ज्या कार्यक्रमांना गर्दी होणार असते असे कार्यक्रम प्रशासनाच्या परवानगीनेच पार पडतात त्यामुळे किती प्रमाणात गर्दी होणार याचा अभ्यास करून तशी यंत्रणा अगोदरच तैनात करणे हे प्रशासनाचे दायित्व नव्हे का ? देवस्थानांच्या यात्रांच्या ठिकाणीही गर्दी होते अशा ठिकाणीही चेंगराचेंगरी झाल्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत. देवळापर्यंत जाणारा रस्ता अरुंद असणे, मार्गाचा बराच भाग स्टॉलधारकांनी व्यापलेला असणे यांमुळे भाविकांना येण्याजाण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध न झाल्याने असले प्रकार घडत असल्याचे ज्ञात असूनही रस्त्याची रुंदी वाढवणे, मंदिरात जाण्याच्या मार्गात स्टॉधारकांना परवानगी न देणे यासारख्या उपाययोजना प्रशासनाकडून केल्या जात नाहीत. मांढरदेवीच्या यात्रेसाठी पूर्वी लाखो भाविक येत असत. या ठिकाणी दुर्घटना घडल्यानंतर ती कशामुळे घडली याविषयीचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना काढण्याऐवजी प्रशासनाने या ठिकाणी यात्रेची प्रथाच बंद केली.

एका आकडेवारीनुसार गेल्या ४० वर्षांत जगभरात चेंगराचेंगरीच्या घटना घडून ७ हजाराहून अधिक व्यक्ती मरण पावल्या, तर १४ हजाराहून अधिक जखमी झाले. अशा एकूण २१३ घटनांपैकी ४९ घटना स्टेडियममध्ये, २५ घटना ऑर्केस्ट्राच्या कार्यक्रमांत, ३८ राजकीय मेळाव्यांत, तर ४१ घटना धार्मिक कार्यक्रमांत घडल्या आहेत. उरलेल्या ६० घटना कसलेही सकृत कारण नसतांना घडलेल्या आहेत. स्टेडियममध्ये दुर्घटना घडली म्हणून कुणी स्टेडियम कायमचेच बंद केले नाहीत. ऑर्केस्ट्राचे कार्यक्रम किंवा राजकीय मेळावे आदींवर आजतागायत बंदी आणण्यात आलेली नाही, गेल्या ३० वर्षांत एकट्या हज येथे ३ हजाराहून अधिक व्यक्ती भीषण गर्दीत मीना व्हॅलीमध्ये मरण पावल्या आहेत; मात्र तेथील सरकार आणि प्रशासन यांनी हज यात्रेवर बंदी आणली नाही किंवा त्यावर निर्बंधही लादले नाहीत. जगभरात सर्वाधिक व्यक्तींचा मृत्यू हा जत्रा, धार्मिक यात्रा, मेळे अशा ठिकाणी झालेल्या चेंगराचेंगरींमध्ये झाला, हे सत्य असले तरी त्यावर बंदी आणणे योग्य नाही. अशा घटना रोखण्यासाठी अन्य देशांत उपाययोजना काढल्या जातात; मात्र आपल्या देशात प्रशासन आपले दायित्व झटकून त्यावर थेट बंदी आणते. हाथरस येथील दुर्घटनेनंतर प्रसार माध्यमांसह पुरोगामी मंडळींनी सर्व दोष भोलेबाबा यांच्यावर टाकून त्यावर चर्चा घडवून आणल्या, भोलेबाबा कोण आहेत, ते एव्हढे मोठे झाले कसे इथपासून तर त्यांची संपत्ती किती, त्यांच्याकडे एव्हढी संपत्ती आली कुठून याचा लेखा जोखा मांडला. हिंदू कसे बुवाबाबांच्या मागे लागून स्वतःचे नुकसान करवून घेत आहेत, एकविसाव्या शतकात विज्ञानाने एव्हढी प्रगती केली असताना बहुतांश हिंदू अद्यापही अंधश्रद्धेच्या गर्तेत असल्याचे चित्र निर्माण करण्यात आले, त्याला आधार देण्यासाठी हिंदूंच्या प्रथा परंपरांमध्ये कशा अंधश्रद्धा भरल्या आहेत यावरही चर्वण करण्यात आले; मात्र या घटनेमागील मूळ कारण शोधण्याचा आणि अशा घटना यापुढे ना घडण्यासाठी भविष्यात कोणत्या उपाययोजना करणार याचा जाब प्रशासनाला कोणीच विचारला नाही. समाजाची नीतिमत्ता आज कामालीची ढासळली आहे. खून, बलात्कार, विनयभंग, एकतर्फी प्रेमातून हत्या यासारख्या घटना प्रतिदिन वाचनात येत आहेत. नात्यांमधील विश्वासही लोप पावू लागला आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंत भ्रष्टाचाराची पाळेमुळे विखुरली आहेत ज्याचा सर्वसामान्यांना प्रतिदिन सामना करावा लागत आहे. महागड्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंपासून घरात येणाऱ्या भाजीपर्यंत सर्वच बाबींत भेसळ केली जात आहे. स्वार्थ, अनैतिकता, दुराचार जागोजागी दिसून येत आहे. व्यावहारिक जीवनात यशस्वी कसे व्हायचे याचे धडे शालेय अभ्यासक्रमातून दिले जात असले तरी नीतिमान आयुष्य कसे जगायचे याबाबत शाळेत शिकवले जात नाही. आपल्या प्रत्येक कृतीकडे आणि मनात येणाऱ्या विचारांकडे जगनियंत्या भगवंताचे लक्ष आहे. जीवनाच्या अंती आपल्याला त्याच्याच चरणी जायचे आहे. आपल्या प्रत्येक पाप पुण्याचा हिशोब त्याच्याकडे मांडलेला आहे ही जाणीव कोणतेही दुष्कर्म करण्यापासून परावृत्त करते. ही जाणीव मनात निर्माण झाली की प्रत्येक कृती करताना माणूस या कृतीमुळे अन्य कुणाची हानी होणार नाही ना ? याचा शतदा विचार करतो, तिनिमत्तेने आणि सदाचाराने वागतो. ही जाणीव जनमानसांत निर्माण करण्याचे काम आजचे प्रवचनकार, निरुपणकार, कथाकार मंडळी करत आहेत. धर्मग्रंथांतील प्रसंगांचा, शिकवणुकीचा सार ही मंडळी लोकांना सांगून त्यांच्यात साधनेचे बीज रोवण्याचे कार्य करत असतात जी आजच्या काळाची नितांत गरज आहे. त्यामुळे हाथरस दुर्घटनेनंतर प्रशासन स्वतःची गर्दी नियंत्रण व्यवस्था चोख करण्याऐवजी प्रवचनकार, कथाकार, संत मंडळींच्या सत्संगाच्या कार्यक्रमांवर निर्बंध आणणार असेल तर ते समाजाची हानी करणारे असेल.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

# शिवजयंती प्रमाणे आता पंढरपूरची वारी टार्गेट करण्याचा प्रयत्न ?

महाराष्ट्रात शिवजयंती उत्सव व पंढरपूरची आषाढी एकादशी लोकउत्सव आहेत शिवजयंती उत्सवात सर्व समाज सहभागी होत असते तर पंढरपूरच्या वारी मध्येज्ञानबा- तुकाराम गजर करीत शहरी ते ग्रामीण भागातील हजारो दिंडया व लाखो वारकरी ध्यास हा जीवाला पंढरीसी जाऊ,वैकुंठीचा राणा डोळ्याने पाहू म्हणत पंढरपूरच्या दिशेने पायी,अनवाणी चालत भक्तिमय होतो शिवजयंती लोकशक्तीचा तर पंढरपूरची वारी लोकभक्तीचा उत्सव आहे परंतू गेल्या दशका पासून शिवजयंती उत्सवात खोटा इतिहास सांगून वाद निर्माण करण्यात येत आहेत त्याच प्रमाणे पंढरपूरच्या वारी मध्ये काही विघातक मंडळी संभ्रम व अफवा अशा वेगवेगळ्या षडयंत्राचे प्रयोग करून वारीला टार्गेट करण्याचा प्रयत्न करीत आहेत शिवजयंती उत्सवमध्ये खोटे तथा अर्धवट संदर्भ देऊन शिवभक्ता मध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न झालेला आहे.

त्याच प्रमाणे आता पंढरपूरच्या वारीमध्ये जातीपातीचे व ईतर षडयंत्राचे प्रयोग करून पंढरपूर वारीला टार्गेट करण्याचा प्रयत्न सुरू झालेला आहे.महाराष्ट्रातील काही समाज विघातक संघटना संस्थांच्या कार्याचा मागोवा घेतल्यास अनेक वर्षा पासून हिंदू समाजाचे सणउत्सव, हिंदूसमाजाचे प्रेरणास्थान व दैवत,महापुरुषांच्या जयंती, पुण्यस्मरणच्या निमित्ताने हिंदू समाजाचां बुद्धिभेद व दिशाभूल करून जातीपाती मध्ये विभागण्याचे षडयंत्र करीत आहेत व काही अंशी त्यांच्या षडयंत्राच्या प्रयोगमध्ये यशस्वी होत असल्याचे दिसत आहे. महाराष्ट्राचा विचार केल्यास ज्या संत,महात्मे,महापुरुषांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोठे योगदान दिले, समाजाला एकतेच्या सूत्रात बांधून ठेवले त्यांच्या जयंती,पुण्यतिथी उत्सवमध्ये दुर्दैवाने केवळ त्याच समाजाची, जातीची माणसं दिसतात सर्व समाज त्यामध्ये सहभागी होत नाही महापुरुष संतांच्या जयंती,पुण्यतिथीचे उत्सव समाजाचे नव्हे तर एका ठराविक जातीचे उत्सव ठरत असल्याचे विदारक सत्य समाजात स्पष्ट दिसत आह

महाराष्ट्रात काही समाज विघातक मंडळीनी शिवजयंती उत्सवात समराज प्रबोधनाच्या गोंडस नावाखाली वादविवाद निर्माण करण्यासाठी अनेक खोट्या इतिहासाचे,अर्धवट संदर्भ देऊन भांडवल केलेल आहे समाजाला संभ्रमित करण्यासाठी प्रचंड प्रमाणात साहित्य सुध्दा निर्माण केलल आहे उदाहरण दाखल श्रीमंत कोकाटे यांच्या विश्ववंद छत्रपती शिवाजी महाराज पुस्तकात किती मोठा खोटा इतिहास सादर केला जात आहे लक्षात येते सदर श्रीमंत कोकाटे यांच्या पुस्तकाच्या उताऱ्यात शिवरायांच्या सैन्यात ५७ तक्के मुस्लिम सैन्य होते.

जैन व बौद्ध सुद्धा होते सेनापती, सरदार वकील मुस्लिम होतें असा कांगावा करून मुळातच सहिष्णू असलेल्या शिवरायांना धर्मनिरेक्ष ठरविण्याचा खोटा इतिहास प्रस्तुत करून वैचारिक गोंधळ निर्माण केला आहे वास्तविक पाहता शिवकालीन इतिहासाच्या कोणत्याही बखरी तपासल्या तरी शिवरायांच्या सैन्यात बोटावर मोजण्या इतकेच मुस्लिम होते हा सत्य इतिहास आहे परंतू सभ्रम निर्माण करण्यासाठी उपरोक्त प्रमाणे कांगावा केला जातो तसेच शिवजयंती इंग्रजी तारखे प्रमाणे की तिथी नुसार असा वाद निर्माण करून शिवभक्ता मध्ये उभी



फूट पाडण्याचा प्रयत्न सुद्धा सतत केला जातो आपल्या देशात सर्व पंथातील महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी तिथी नुसार करण्याची परंपरा आहे भगवान गौतम बुद्ध ,भगवान महावीर महात्मा बसवेश्वर, विश्वकर्मा अग्रसेन, गुरू नानक पासून गुरू गोविंदसिंग तसेच ज्ञानेश्वर माऊली पासून संत तुकाराम महाराज यांच्या स्मरणाचे उत्सव तिथी प्रमाणे साजरे केले जातात पण शिवजयंती इंग्रजी तारखे प्रमाणे साजरी करून शिवभक्तां मध्ये उभी फूट पाडण्याचे षडयंत्र केले जाते

शिवजयंती प्रमाणे आता विघातक शक्ती पंढरपूर वारीला टार्गेट करीत असल्याचे लक्षात येत आहे आषाढी एकादशीच्या निमित्ताने हजारो दिंड्या व लाखो वारकरी पंढरपूरला येत असतात त्यामुळे वारीमध्ये वारकरी बंधूत भेद जातीपातीचे भेद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो वारकरी संप्रदाय मध्ये टाळकरी- माळकरी, तुकोबांना मानणारे, ज्ञानोबा माऊलीना मानणारे असे भेद निर्माण करण्याचा प्रयत्न सुद्धा सुरू झालेला आहे सोबतच पंढरपुरात येणाऱ्या संत एकनाथ ते नामदेव महाराज व ज्ञानेश्वर माऊली ते तुकोबांच्या पालख्यां मध्येज्ञानबा तुकारामनव्हे तरनामदेव तुकाराम गजर करण्याचा प्रयत्न करून वारकऱ्याम ध्ये गोंधळ निर्माण केला गेला आहे तुकोबांच्या अर्धवट अभांगाचा सोईस्कर प्रयोग करुन तुकोबावैदिक की विद्रोही- तुकारामाचे वैकुंठ गमन की हत्याअसा वैचारिक गोंधळ निर्माण केलेला आहे मागील वर्षीच्या वारी मध्ये तुकोबांचा अभंग मोठ्या प्रमाणात मीडिया,सोशल मीडियात जाणीवपूर्वक फिरवून वारकरी बंधुत संभ्रम निर्माण करण्यात आला आहे अल्ला देवे, अल्ला दिलावे ! अल्ला दारू, अल्ला खिलावे ! अल्ला बगर नही कोये, अल्ला करे सो ही होये !!

आपल्या देशाचा पाया अध्यात्म असून सर्व संतांनी समाजात सतत भेदा भेद भ्रम अमंगळ - विश्व ची माझे घर असे उदात्त व सर्वसमावेशक सहिष्णू विचार दर्शन मांडले आहे सर्व संताच्या प्रार्थना मानव उत्थानाच्या व लोकमंगल कामनेच्या राहिलेल्या आहेत तुकोबांच्या गाथे मध्ये जवळपास ४००० अभंग असून समाज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर भाष्य केलेल आहे वेद शास्त्र पासून ज्ञान अध्यात्म व ज्ञान विज्ञान ते पर्यावरण अशा विविध पैलूचे महत्व सुध्दा विशद केले आहे केवळअल्ला देवे-अल्ला करे सो होय एवढंच सांगितले नाही.

परंतू ज्या प्रमाणे गेल्या दोन शतका पासून महाराष्ट्रात चुकीचा खोटा इतिहास मांडून शिवरायांची धर्मनिरपेक्ष व मुस्लिम धार्जिणे अशी प्रतिमा उभी करण्यासाठी चढाओढ लागली आहे त्याच प्रमाणे तुकोबा यांचा उपरोक्त अभंग खोडसाळ बुद्धीने प्रस्तुत करून तुकोबा मुस्लिम धार्जिणे,मुस्लिम सुफी संत परंपरा मानणारे किंवा अल्लाची भक्ती करणारे होते असा चेष्टा करणारा गैरसमज निर्माण करणारा प्रयोग झालेला आहे वारकरी संप्रदाय मध्ये असे संभ्रम निर्माण करणारे प्रयोग करून वारकरी जातीपंथात कसा विभागला जाईल, दुफळी कशी निर्माण केली जाईल यासाठी आता कसोशीने प्रयत्न केले जात आहेत.

एकूणच काही समाज विघातक मंडळी पंढरपूर वारी मध्ये घुसल्या असून त्यांनी षडयंत्रांचे सर्व प्रयोग ठरवून व सुनियोजितरीत्या करण्यास सुरुवात केली आहे तसेच वारी मधिल सामाजिक समरसता व सामाजिक एकतेचे विशाल दर्शन विघातक मंडळीच्या डोळ्यात सतत खुपत असल्याने त्यांना सामाजिक एकतेचा कणा मोडायचा आहे म्हणूनच त्यांनी पंढरपूर वारीला टार्गेट करण्याचा प्रयत्न चालविला आहे

महाराष्ट्रात होत असलेल्या शिवजयंती उत्सवा मध्ये किंवा पंढरपूरच्या वारी मध्ये कोणीही व कधीच जातीपातीचा विचार करीत नाही शिवजयंती मध्ये सामील झालेला प्रत्येक माणूस स्वतःला शिवरायांचा मावळा व पंढरपूरच्या वारी मध्ये सामील झालेला प्रत्येक माणूस स्वतःला केवळ विठोबाचा वारकरी समजतो हे पक्क समीकरण आहे त्यामुळे विघातक शक्ती हिंदू समाजातील सामाजिक एकतेच समीकरण बिघडविण्या साठी तसेच वारकरी संप्रदाय मध्ये दुफळी निर्माण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करीत आहेत भविष्यात त्यांचे प्रयत्न तीव्र केले जातील याची जाणीव ठेऊन समाज विघातक मंडळी यशस्वी होणार नाहीत याची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे

**अशोक राणे , अकोला**
**भ्रम .९४२३६५८३८५**

## असदुद्दीन ओवैसी यांच्यावर कारवाई होणार का ?

लोकसभेच्या निकालानंतर नवनिर्वाचित खासदार जेव्हा संसदेत पहिल्यांदा एकत्र येतात तेव्हा त्यांना खासदारकीची शपथ दिली जाते. हा शपथविधीसुद्धा मनोरंजक असतो. या शपथविधीच्या कार्यक्रमात खासदारांच्या विविध छटा पाहायला मिळतात. खासदारांपैकी कोणी इंग्रजीत तर कोणी हिंदीत तर कोणी संस्कृत भाषेतही शपथ घेतात. अनेक खासदार संसदेत कोणाला समजो वा न समजो आपल्या मातृभाषेतुन शपथ घेतात. यंदाही आपल्या मातृभाषेत शपथ घेणाऱ्या खासदारांचे प्रमाण लक्षणीय होते. एमआयएम पक्षाचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी उर्दू भाषेत शपथ घेताना शेवटी जय भीम -जय भीम, अल्लाहू अकबर आणि जय पॅलेस्टाईन अशा घोषणा दिल्या. पॅलेस्टाईन आणि इस्राईल यांच्यातील युद्ध थांबण्याचे नाव घेत नाही. पॅलेस्टाईनने पोसलेल्या आतंकवादाला इस्त्राईल देशाने जशास तसे उत्तर दिल्याने आतंकवादाने पीडित असलेल्या समस्त देशांनी इस्त्राईलला पाठिंबा दिला आहे ज्यामध्ये भारत सुद्धा आहे. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १०२ ड नुसार संसदेतील कोणत्याही सदस्याने अन्य कोणत्याही देशाला समर्थन देणे अवैध आहे. अशाने त्या संशयाचे सदस्यत्व रहित होऊ शकते. भारतीय संसदेत शपथ घेतांना अन्य देशांशी निष्ठा ठेवणे, हा देशद्रोह आहे, तसेच हा भारताचा अपमानही आहे. त्यामुळे सध्या गोव्यात सुरु असलेल्या वैश्विक हिंदु राष्ट्र महोत्सवात असदुद्दीन ओवैसी यांचा तीव्र निषेध व्यक्त करून लोकसभेचे अध्यक्ष आणि केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री यांच्याकडे असदुद्दीन ओवैसी यांची खासदारकी रहित करण्याची मागणी करण्याचा ठराव करण्यात आला. ज्याला उपस्थित सर्वांनीच अनुमोदन दिले. हमास या कट्टर पॅलेस्टिनी गटाने इस्रायलवर आतंकी हमला करून इस्त्राईलमध्ये हाहाकार उडवला होता. इस्त्राईलच्या महिला सैनिकांना, लहान मुलांना ओलीस ठेवले, कोवळ्या मुलांचे त्यांच्या पालकांसमोर शिरच्छेद केले, महिला सैनिकांची नग्न धिंड काढली, त्यांच्यावर बलात्कार करण्यात आले, इस्त्राईलच्या नागरिकांना हालहाल करून ठार केले. त्याच्या प्रत्युत्तरादाखल इस्त्राईलने हमासच्या ताब्यात असलेल्या गाझा पट्टीवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. आतंकवाद्यांना पोसणाऱ्या पॅलेस्टिनींचे सुद्धा यामध्ये नुकसान झाले. इस्त्राईलने जोरदार प्रत्युत्तर दिल्यावर इस्त्राईल कसा मानवतावादाला विसरला आहे, पॅलेस्टीनी महिलांचे, नागरिकांचे कसे हाल होत आहेत, त्यांच्यावर कसा अन्याय होत आहेत अशा स्वरूपाच्या बातम्या माध्यमांत पेरल्या गेल्या, युद्धातील छायाचित्रे माध्यमांवर झळकावण्यात आली या सर्वातून लोकांच्या भावना मिळवण्याचा आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर इस्त्राईलविषयी रोष पसरवण्याचा प्रयत्न पॅलेस्टाईन कडून केला जात आहे. मात्र ही सर्व आपल्याच कर्माची फळे आहेत याची जाणीव पॅलेस्टाईनला केव्हा होणार ? पॅलेस्टाईनमध्ये मुस्लिमांची संख्या अधिक असल्याने भारतासह जगभरातील मुस्लिम पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरले. भारतातही अनेक ठिकाणी यांनी निदर्शने केली. पॅलेस्टाईनने आजतागायत पोसलेल्या आतंकवादाच्या विरोधात किंवा हमसने इस्त्राईली नागरिकांचा, महिलांचा आणि कोवळ्या मुलांच्या केलेल्या छळाबाबत मात्र यापैकी कुणीच ब्र काढायला मागत नाही. आतंकवाद ही आज जगासमोरील मोठी समस्त बनली आहे. महासत्ता म्हणवून घेणारे देशही आतंकवादासमोर हतबल झाले आहेत असे असताना आतंकवादाविरोधात लढणाऱ्या इस्त्राईलच्या बाजूने उभे राहण्याची आवश्यकता असताना आतंकवाद पोसणाऱ्या देशाचा एका खासदाराने संसदेत जयघोष करणे नक्कीच निषेधार्ह आहे. पॅलेस्टाईनचा जयजयकार करणाऱ्यांना आज थांबवले नाही तर भविष्यात जय हमास, जय पाकिस्तान यासारख्या घोषणाही संसदेत ऐकायला मिळतील त्यामुळे असदुद्दीन ओवैसी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी देशभरातून करण्यात येत आहे. असदुद्दीन ओवैसी हे वादग्रस्त विधानासाठी नेहमीच चर्चेत असतात. यावेळी पुन्हा एकदा त्यांनी वाद ओढवून घेतल्याने संसद त्यांच्यावर काय कारवाई करणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

**सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार (मुख्य आवृत्ती सिंधुदुर्ग)** : संस्थापक, संपादक कै.प्राचार्य मुकुंदराव कदम (MA,LLB), मालक, मुद्रक, प्रकाशक : ॲड.रूपाली मुकुंद कदम डांगे (BSL,LLB,MCA) R.N.INo. 43711/85 संपादक : अँड रूपाली मुकुंद कदम डांगे मुद्रणस्थळ : न्यु विक्रम मुद्रणालय, कोपार्डे, जि.कोल्हापूर महाराष्ट्र-४१६२०४, येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२, उपसंपादक : विक्रम मुकुंद कदम, कार्यकारी संपादक मंडळ : प्रा. ऊज्वला कदम राठौर, डॉ.शर्मिला कदम राजपुत, ई मेल-कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी व जाहिरातीसाठी संपर्क : rupasamachar@gmail.com, बातमी व फोटोसाठी संपर्क sindhudurg.samachar@gmail.com सिंधुदुर्ग-फोन: (०२३६७) २३१९२५, फॅक्स-२३२१०१ वेंगुर्ला : बी.के.रोड फोन : २६३७४६, मुंबई/पुणे फोन : ९८२२९७९७३२, रत्नागिरी : गाळा नं. ३८, २ रा मजला, कोल्हापूर अरिहंत अपार्टमेंट फोन : (०२३१) २५२३००५ मुंबई संपर्क कार्यालय सत्यवान बिल्डींग पडवळनगरए ठाणे (वेस्ट)४००६०४

# आचरा पारवाडी, कालावल नद्या धोक्याच्या कक्षेत

पान १ वरून..

काही काळ अडथळा निर्माण झाला होता. मात्र सकाळी नऊ नंतर पावसाने उसंत घेतल्यामुळे पाणी ओसरायला लागेल. त्यामुळे संभाव्य धोका टळला. आचरा पारवाडी कालावल नद्या दुथंडीभरुन वाहु लागल्या ने खाडीकिनाऱ्या लगतची भातशेती धोक्यात आली आहे. पाणी शेतीत असेच साचून राहिल्यास शेती कुजण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. गेले दोन दिवस सतत कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे कर्ली नदिच्या पाणी पातळीत अचानकपणे वाढ होऊन रात्रौ अडीच वाजता काळसे बागवाडीला पुराच्या पाण्याने वेढा दिला. आणि ऐन झोपेच्या वेळी बागवाडी ग्राम स्थांची मात्र तारांबळ उडाली. काही शेतकरी आणि ग्रामस्थांनी आपली गुरे ढोरे, वाहने, ट्रॅक्टर इत्यादी वाहने सावधगिरी बाळगून रात्रीच होबळीचा माळ सातेरी मंदिर येथे सुरक्षित स्थळी हलवली. पण काही शेतकऱ्यांची गुरे अजूनही पुराच्या वेढ्यामध्ये अडकली आहेत. आज सकाळ पासून पाणी पातळीमध्ये अजूनच मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे सकाळच्या वेळी पुरस्थीती गंभीर झाली होती. अचानक वाढलेल्या पाण्यामुळे काळसे धामापूर मधील शेती क्षेत्रात नांगरणीसाठी वापरण्यात येणारे काही शेतकऱ्यांचे पॉवर टीलर पुराच्या पाण्याखाली अडकल्याची माहिती यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी दिली. तसेच लावणी साठी काढून ठेवलेला तरवा ही मोठ्या प्रमाणात वाहून गेला आहे. संध्याकाळपर्यंत पुरस्थिती आटोक्यात न आल्यास बागवाडीतील बहुतांश घरांमध्ये पुराचे पाणी घुसून फार मोठी पुरहानी होऊ शकते अशी भिती स्थानिकांनी व्यक्त केली.

दरम्यान आज पहाटेपासूनच प्रशासन यंत्रणा मात्र बागवाडी ग्रामस्थांच्या मदतीसाठी सज्ज झाली असून ग्रामपंचायत , महसूल प्रशासन आणि आरोग्य विभाग, पोलीस प्रशासन, पंचायत समिती विभाग काळसे गावात ठाण मांडून आहेत व पुरस्थीतीवर लक्ष ठेवून बागवाडी ग्रामस्थांना आवश्यक मदत पोचवण्यासाठी सातेरी मंदिर परीसरात उपस्थित आहेत. मालवण तहसीलदार वर्षा झाल्टे यांनी आज सकाळी काळसे येथे भेट देउन बागवाडी येथील पुरस्थीतीचा आढावा घेतला आणि स्थानिकांशी चर्चा केली व त्यांना धोका न पत्करता सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याचे आवाहन केले. ग्रामस्थांनी स्थलांतर केल्यावर त्यांची राहण्याची व्यवस्था नजीकच्या शाळेमध्ये केली असून त्यांच्या जेवणाखाण्याची व्यवस्थाही प्रशासना कडून करण्यात येईल असे सांगितले. व पुरस्थीती अधिक गंभीर झाल्यास आवश्यक बोटी , लाईफ जॅकेट आणि इतर साहित्याची व्यवस्था करण्यात आली असल्याचे सांगितले. मंडळ अधिकारी डी. व्ही शिंग्रे , हेड कॉन्स्टेबल टी. जी. मोरे. पोलिस पाटील विनायक प्रभु , यांनी स्थानिक रहिवाशी महेश कोरगांवकर यांच्या होडीतून बागवाडीमध्ये जाऊन पुरस्थीतीची पाहणी केली आणि रहिवाशांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले.

यावेळी स्थानिक ग्रामस्थांनी विहीरींमध्ये पुराचे पाणी गेल्या मुळे सर्व नागरीकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी अशी मागणी केली. आणि पुराचा धोका वाढल्यास आपण लगेच स्थलांतर करु असे आश्वासन तहसीलदार वर्षा झाल्टे यांना दिले. यावेळी तहसीलदार वर्षा झाल्टे यांच्यासोबत निवासी नायब तहसीलदार गंगाराम कोकरे, मंडळ अधिकारी डी. व्ही. शिंग्रे, तलाठी निलम सावंत, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रफुल्ल वालावलकर, विस्तार अधिकारी श्रीकृष्ण सावंत, ग्राम सेवक पी. आर. निकम, सरपंच विशाखा काळसेकर, चौके प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सहाय्यक एस. एस. चव्हाण, आरोग्य सहाय्यीका वाय. एस. सावंत, गौरी कसालकर, समुदाय आरोग्य अधिकारी डी. डी. शेवडे, कट्टा पोलीस दुरक्षेत्राचे हेड कॉन्स्टेबल टी. जी. मोरे, सिध्देश चिपकर, पोलीस पाटील विनायक प्रभु , कोतवाल प्रसाद चव्हाण, ग्रामपंचायत कर्मचारी श्रीकृष्ण भाटकर, सावंत, यांच्या सह निवृत्त पोलीस कर्मचारी वालावलकर, यांच्या सह स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

खारेपाटण येथे काल मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले. शुक नदीने धोक्याची पातळी ओलांडून खारेपाटण येथे पुरस्थिती निर्माण झाली होती. अनेक रस्ते पाण्याखाली गेले होते. पुराचे पाणी काही लोकांच्या घरात देखील घुसले होते. यामुळे लोकांचे नुकसान झाले. खारेपाटण मच्छिमार्केट मध्ये सुद्धा पुराचे पाणी घुसल्याने येथील चिकन विक्रेत्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.जैन बस्ती तील लोकांच्या घरात पाणी गेल्याने त्यांचे ही नुकसान झाले आहे.कणकवली तहसीलदार यांनी काल रात्री उशिरापर्यंत खारेपाटण मध्ये स्वतः उपस्थित राहून पुरस्थिती ची पाहणी करून लोकांना दिलासा दिला होता. आज पुन्हा तत्परतेने खारेपाटण येथे येऊन तहसीलदार देशपांडे यांनी नुकसान ग्रस्त भागाची पाहणी केली.

मच्छि मार्केट मध्ये जाऊन येथील नुकसान ग्रस्त विक्रेत्यांशी संवाद साधला त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शिवाय जैन बस्तीत जाऊन तेथील नुकसान ग्रस्त लोकांच्या समस्या जाणून घेतल्या व नुकसान झालेल्या घराची पाहणी केली.नुकसान ग्रस्त लोकांना मदतीचा दिलासा दिला. यावेळी मा.जि प सदस्य बाळा जठार,खारेपाटण सरपंच प्राची इस्वलकर, उपसरपंच महेंद्र गुरव, तलाठी -जैनवार ग्रा.प सदस्य जयदीप देसाई, किरण करले, बूथ कमिटी शेखर शिंदे ग्रामपंचायत कर्मचारी व अनिकेत गुरव आदि उपस्थित होते.

## पान १ वरून

### अतिवृष्टीमध्ये जामसंडे खाकशी वाडी येथे कोसळली पाऊलवाटेची संरक्षक भिंत

पूर्णत: श्रीधर पेडणेकर यांच्या अंगणामध्ये पडले आहेत. अंगणामध्ये संरक्षण भिंतीचे दगड आल्याने त्यांना घराबाहेर पडणे देखील कठीण बनले आहे. दरम्यान सोमवारी पहाटे झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्यावर पाणी आल्याने हिंदळे ते मोर्वे, मिठबाव ते दहिबाव, दहिबाव ते नारिंग्रे,कोटकामते ते खुडी, हे मार्ग बंद होते तर रहाटेश्वर ते कालवी गढीताम्हणे विजयदुर्ग या भागातील कॉजवे देखील पाण्याखाली आले होते दुपारी ११ नंतर पावसाने थोडीशी विश्रांती घेतली आहे.

### सरळ रेषेत डोंगर कापले जात असल्याने ही स्थिती निर्माण झाली असल्याचा स्थानिकांचा आरोप!

आहे. कुठली जीवितहानी झाली नाही. मात्र अशा दरडी कोसळण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरकारने हे विषय गांभीर्यतीने घेऊन कंत्राटदाराला आणि कंपनीला ब्लॅक लिस्टमध्ये काढावे अशी मागणी नागरिक करत आहेत. धारगळ महाखाजन येथील ज्या पद्धतीने दरड कोसळली त्याच पद्धतीने मालपे न्हय बाग रस्त्यावरील दरड रविवारी कोसळली. त्याच दिवशी उगवे येथील एक रस्त्याची दरड कोसळली. त्या ठिकाणी जीवितहानी झाली नसली तरी मात्र वाहनांची मोठ्या प्रमाणात नुकसानी झाली.

धारगळ महाखाजन येथे जी दरड दुसऱ्यांदा कोसळली तो रस्ता एकेरी मार्गासाठी बंद करण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्ग धारगळ ते दोन खांब पर्यंतचा एकेरी महामार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. शिवाय मालपे न्हयबाग येथील जो बायपास रस्ता राष्ट्रीय महामार्ग सरकारने केला होता. त्याठिकाणीही मोठ्या प्रमाणात दरड कोसळल्यामुळे हा पूर्ण रस्ता बंद करून जो पूर्वीचा राष्ट्रीय महामार्ग होता त्याच रस्त्यावरून सर्व प्रकारची वाहतूक वळवलेली आहे. या रस्त्यांच्या बाजूला मोठमठे डोंगर आहेत. हे डोंगर कापताना कंत्राटदराने किंवा कंपनीने सरकारच्या टीसीपी विभागाकडून कसल्याच प्रकारचे परवाने घेतलेले नाहीत. जर परवाने घेतलेले असते तर डोंगर सरळ रेषेत कापले असते का ? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.कंत्राटदाराने रस्त्याच्या बाजूला असलेले डोंगर सरळ रेषेत कापून भविष्यात मोठ्या प्रमाणात या दरडी कोसळण्याची संधी दिलेली आहे.

### जुन्या आंबेरी पुलाला पडले भगदाड

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना आ. वैभव नाईक यांनी फैलावर घेतले. आंबेरी पुलासाठी आ. वैभव नाईक यांनी बजेट अंतर्गत ६ कोटी २५ लाख रु मंजूर करून पुलाचे काम पूर्ण करून घेतले. मात्र त्यानंतर दोन वर्षात सत्तांतर होऊन सत्तेत आलेल्या भाजपने पुलाच्या ॲप्रोच रोडसाठी आवश्यक असलेला ५० लाखाचा निधी दिला नाही. वारंवार पाठपुरावा करून देखील याकडे पालकमंत्री आणि अधिकाऱ्यांनी डोळेझाक केली. त्यामुळे याचा फटका आज माणगाव खोऱ्यातील लोकांना बसला आहे. येणाऱ्या २ दिवसात ॲप्रोच रोडचे काम पूर्ण करून नवीन पुलावरून वाहतूक सुरु न झाल्यास अधिकाऱ्यांना घेराव घालण्याचा इशारा आ. वैभव नाईक यांनी दिला. यावेळी संजय पडते, अमरसेन सावंत,राजू कविटकर, अजित परब, अतुल बंगे, कौशल जोशी, सचिन काळप, उदय मांजरेकर, अमित राणे आदी उपस्थित होते.

### दापोलीत पाण्याने वेढा दिल्याने घरात अडकलेल्या सहा जणांना वाचवले

बस स्टॉपच्या पाठीमागे असलेल्या करमरकर कुटुंबाच्या यांचे घराजवळ पाणी भरले. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने याची दखल घेऊन एकाच घरात राहणा-या दोन कुटुंबातील मयुरेश देविदास करमरकर (वय ३७), देविदास गणपत करमरकर (७४), प्रमिला देविदास करमरकर (६०), अजित नारायण जोशी (७२), अश्विनी अनुप जोशी (३५), अनय अनुप जोशी (६) या सर्वांना सुरक्षित ठिकाणी हलवले आहे. यावेळी तहसीलदार, पोलिस निरीक्षक, सरपंच, पोलिस पाटील, ग्राम स्थ उपस्थित होते.

### १० कोटी रुपये खर्च करून बांधलेल्या नवीन शासकीय विश्रामगृहाला गळती

विभागाच्या सर्वच कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार झाला आहे. यासंदर्भात मी आमदार म्हणून आवाज उठवणार असून, बांधकाम मंत्र्यांना व त्यांच्या अधिकाऱ्यांना या प्रश्नी जाब विचारला जाईल असा इशारा आमदार वैभव नाईक यांनी दिला. आज सकाळी कणकवलीतील या गळती लागलेल्या शासकीय विश्रामगृहाची पाहणी आमदार वैभव नाईक यांनी केली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता के.के. प्रभू या देखील उपस्थित होत्या.

### नीटचा पेपर फुटल्याची केंद्र सरकारची पहिल्यांदाच सर्वोच्च न्यायालयात कबुली

आहे की अनियमितता कमी प्रमाणात झाली आहे. परंतु दुसरीकडे वेगवेगळ्या राज्यांमध्ये एफआयआर नोंदवल्यानंतर या प्रकरणाचा तपास न्यायालयाकडे सोपवण्यात आला आहे. त्यावर न्यायालयाने विचारले की, याचा अर्थ एनटीएने पेपर लीक झाल्याचे मान्य केले आहे का? त्यावर सॉलिसिटर जनरल म्हणाले की, असे प्रकरण केवळ एकाच ठिकाणी समोर आले आहे. त्या प्रकरणातही आरोपींना अटक करण्यात आली आहे आणि ज्या लोकांना फायदा झाला त्यांची ओळख पटली आहे.पेपर फुटल्याची अशी तक्रार फक्त पाटण्यात आली होती ज्यात आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पेपर फुटल्याचे सरकारने मान्य केले

विद्यार्थ्यांच्या वकिलांनी सांगितले की, व्हॉट्सप आणि टेलिग्राम चॅनलवर पेपर लीक झाल्याचे स्पष्ट झाले आहे. याचे पुरावे आमच्याकडे आहेत. फुटलेला पेपर एका शाळेत वाय-फाय प्रिंटरद्वारे छापण्यात आला होता. बिहार पोलिसांच्या आतापर्यंतच्या तपासात अशा वेगवेगळ्या गटांची माहिती मिळाली आहे.

# लॅपटॉप चोराला पोलिस कोठडी

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

रेल्वेच्या सुरत ते मंगलोर प्रवास करणाऱ्या प्रवाशाचा ५० हजारांच्या लॅपटॉप चोरी प्रकरणातील संशयिताला पोलिसांनी अटक केली आहे. त्याला न्यायालयाने एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे. प्रसाद जगन्नाथ पाटील असे संशयिताचे नाव आहे. ही घटना ६ एप्रिल रोजी सकाळी साडेचार ते पाच या सुमारास उक्षी रेल्वेस्टेशन दरम्यान घडली होती. फिर्यादी रणजित हे रेल्वेच्या सुरत ते मंगलोर गाडीतून प्रवास करत असताना चोरट्याने रत्नागिरी - उक्षी रेल्वेस्टेशनदरम्यान त्यांचा ५० हजारांचा लॅपटॉप पळविला होता.

# शिरगाव येथे घरावर कोसळले झाड; रहाटेश्वर येथील कॉजवे पाण्याखाली तर देवगड नांदगाव वाहतूक बंद

**देवगड । पांडूशेठ साटम**

देवगड तालुक्यात पावसाने रविवारी सकाळपासून धुव्वाधार सुरुवात केल्याने ठिकठिकाणी पडझडीच्या घटना घडल्या असून दाभोळे शिरगाव या दोन गावांना वादळीसह पडलेल्या मुसळधार पावसाचा मोठा फटका बसला आहे. घरावर झाडे पडून तसेच शिरगाव बाजारपेठेत मोठा मोठा वटवृक्ष उन्मळून दुकानाच्या पडवीवर पडल्याने मोठे नुकसान झाले आहे. वटवृक्ष कोसळल्याने देवगड नांदगाव मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

देवगड तालुक्यामध्ये पावसाने पुन्हा जोरदार हजेरी लावली असून रविवारी सकाळपासून वादळी वाऱ्याचे



धुवाधार पाऊस पडल्याने दाभोळे शिरगाव येथील घरांची पडझड झाली होती. दाभोळे येथील रस्त्याबाबत असलेल्या मातीची छोटी दरड कोसळल्याने रस्त्यावर माती आल्याने दाभोळे पुल ते दाभोळे ग्रामपंचायत रस्ता वाहतुकीस बंद झाला होता. तेथीलच आत्माराम कोळकर यांच्या घरावर आंब्याचे झाड पडून सुमारे ३० हजार रुपयांचे नुकसान झाले तर शिरगाव बाजारपेठेतील प्रदीप वाडये यांच्या घरावर आंब्याचे झाड पडून सुमारे ४० हजार रुपये नुकसान झाले. देवगड निपाणी मार्गावरील शिरगाव बाजारपेठ येथे मोठा वटवृक्ष मुळासहित व्यापारी पुंडलिक शेंट्ये यांच्या दुकानावर कोसळला त्यामध्ये त्यांच्या दुकानाच्या पडवीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

देवगड तालुक्यात पावसाने धुवाधार सुरुवात करून ठिकठिकाणी पावसामुळे पूरक सदृश्य स्थिती निर्माण झाली होती. काही ठिकाणी रस्ता, कॉजवे,पाण्याखाली गेल्याने रस्ता वाहतुकीस काही काळ पूर्णतः बंद झाला होता.

# रिफायनरीविरोधात मुंबईत आज मोर्चा आणि एकदिवसीय धरणे आंदोलन

**राजापूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील बारसू - सोलगाव परिसरामध्ये रिफायनरी प्रकल्प उभारण्याच्या हालचाली शासनस्तरावरून सुरू असताना बारसू - सोलगाव पंचक्रोशी रिफायनरीविरोधी संघटनेच्या नेतृत्वाखाली स्थानिक ग्रामस्थांनी प्रकल्पा विरोधात आक्रमक पवित्र घेतला आहे. प्रकल्पाविरोधात मुंबई येथील आझाद मैदानावर आज (ता.९) मोर्चा आणि एकदिवसीय धरणे आंदोलन छेडण्यात येणार आहे. तशी माहिती बारसू - सोलगाव पंचक्रोशी रिफायनरीविरोधी संघटनेतर्फे देण्यात आली आहे.

या आंदोलनामुळे रिफायनरी विरोधातील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. माती परीक्षण झाल्यानंतर आतापर्यंत या प्रकल्पाबाबत कोणतीही हालचाल दिसत नव्हती. या परिसरलगतच्या वाडीखुर्द येथील जमीन औद्योगिक क्षेत्र म्हणून शासनाने घोषित केली आहे. या परिसरामध्ये रिफायनरी प्रकल्प होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. स्थानिक ग्रामस्थांनी बारसू - सोलगाव पंचक्रोशी रिफायनरी विरोधी संघटनेच्या नेतृत्वाखाली प्रकल्पाविरोधात धरणे आंदोलन छेडण्यात येणार आहे.

# सोनुर्लीच्या बंद बीएसएनएल टॉवरबाबत जिल्हा प्रबंधकांना विचारला जाब

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

सोनुर्ली गावासाठी उभारण्यात आलेला बीएसएनएलचा टॉवर वारंवार बंद असल्याने उबाठा शिवसेनेच्या शिष्ठमंडळाने बीएसएनएलचे जिल्हा प्रबंधक जिन्नू यांना कार्यालयात जात जाब विचारला. हा टॉवर बंद करा. अन्यथा, सुरळीत चालु करा अशी मागणी केली. यावेळी तात्काळ टॉवरला भेट देऊन तो कार्यान्वित करण्याचे आश्वासन श्री. जिन्नू यांनी दिले. सोनुर्ली गावात बीएसएनएलचा टॉवर असून नसल्यासारखा आहे. या ठिकाणी बॅटरी बॅकअप नसल्याने हा टॉवर जास्त करून बंदच असतो. टॉवरकडे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याने ग्रामस्थातून नाराची व्यक्त होत आहे.

वारंवार तक्रार करुनही याकडे अधिकारी लक्ष देत नसल्याने अखेर उबाठा सेनेचे जिल्हा संघटक शब्बीर मणीयार, शहर प्रमुख शैलेश गंवडळकर, सोनुर्ली उपविभाग प्रमुख विनोद ठाकुर, शाखा प्रमुख नरेश मोर्ये, संकेत गावकर



आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित सोनुर्ली उपविभाग प्रमुख श्री. ठाकुर यांनी श्री. जिन्नु यांचे लक्ष वेधतांना सोनुर्ली गावासाठी पाच वर्षांपूर्वी बीएसएनएलचा टॉवर उभारण्यात आला. मात्र या टॉवरची सेवा सुरळीत नसल्याने ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या टॉवरसाठी आवश्यक असलेली बॅटरी बॅकअप केव्हाची चोरीला गेली असून टॉवरसाठी आलेली इलेक्ट्रिक केबल अंडरग्राउंड नसल्याने ती वारंवार कट होऊन या टॉवर बंद पडतो असे सांगितले. यावर आपण तात्काळ लक्ष घालून टॉवर सुरळीत करण्यासाठी पाऊल उचलतो असे आश्वासन श्री. जिन्नु यांनी दिले.

# पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरण, डॉक्टरांना रक्त बदलण्याचा सल्ला नेमका कुणी दिला?

पान १ वरून..

पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणाचा सखोल तपास सुरु असून दररोज नवनवीन खुलासे होत आहेत. या अपघात प्रकरणाशी संबंधित प्रत्येक व्यक्तीची सध्या कसून चौकशी सुरु आहे. या प्रकरणात विशाल अग्रवालच्या (तळीहरश्र सरीुरश्र) मुलाचे ब्लड रिपोर्ट बदलण्यात आल्याची धक्कादायक माहिती काही दिवसांपूर्वी उघडकीस आली होती. याप्रकरणी पोलिसांनी ससून रुग्णालयातील दोन डॉक्टरांना अटक करण्यात केली होती. आता या डॉक्टरांना रक्त बदलण्याचा सल्ला नेमका कुणी दिला याबाबत मोठी अपडेट समोर आली आहे.

**रक्ताचे नमुने बदलण्याचा सल्ला नेमका कुणी दिला?**

अश्फाक मकानदार आणि ससून रुग्णालयातील न्यायवैद्यक शास्त्र विभागाचे अधीक्षक डॉ. अजय तावरे डॉ. तावरे यांनीच रक्त बदलण्याचा सल्ला दिल्याची माहिती समोर येत आहे. मकानदार आणि डॉ. तावरे यांनीच अल्पवयीन मुलाऐवजी आईचे रक्त बदलण्यास सांगितल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. विशाल अग्रवाल आणि मकानदारची एका कॅफेत भेट झाली होती. तुमच्यावर कारवाई होईल, असा इशारा विशाल अग्रवालला मकानदारने दिला होता. या भेटीनंतर विशाल अग्रवाल हा संभाजीनगर येथे फरार झाला होता. पोलिसांनी त्याला संभाजीनगरमधून अटक केली होती.

**मकानदार, गायकवाडला १० जूनपर्यंत पोलीस कोठडी**

अल्पवयीन मुलाच्या रक्त नमुन्यात बदल केल्याप्रकरणी गुन्हे शाखेने अश्फाक मकानदार आणि अमर गायकवाड या दोघांना अटक केली आहे. सध्या मकानदार आणि गायकवाड या आर्थिक व्यवहार करणाऱ्या दोघांना १० जूनपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे. अग्रवाल पिता-पुत्राविरूद्ध आणखी एक गुन्हा दाखल

कल्याणीनगर अपघातप्रकरणी चर्चेत असलेल्या सुरेंद्र अग्रवाल आणि विशाल अग्रवाल या पिता-पुत्रासह पाच जणांवर बांधकाम व्यावसायिकाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यामुळे अग्रवाल पिता-पुत्राच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. सावकारी कर्जाला कंटाळून वडगाव शेरी येथे राहणाऱ्या ४१ वर्षीय बांधकाम व्यावसायिकाने ९ जानेवारी रोजी आत्महत्या केली होती. याप्रकरणी विनय विष्णुपंत काळे याच्यावर जानेवारीत गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याच्या तपासात सुरेंद्रकुमार अग्रवाल, रामकुमार अग्रवाल, विशाल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी रवी हुडलानी आणि मुकेश झेंडे यांचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## थोडक्यात



### ऐश्वर्य मांजरेकर बनला ग्रीन योद्धा

**ओरोस । प्रतिनिधी**

युनीसेफ महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र युथ फॉर क्लायमेट ॲक्शन, महाराष्ट्र शासन, Center for Environment Education, यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रीन योद्धा कार्यशाळा पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये महाराष्ट्रातील वातावरणीय बदलावर काम करणाऱ्या ठराविक युवकांची निवड ग्रीन योद्धा कार्यशाळेसाठी करण्यात आली होती. यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील युवा सामाजिक कार्यकर्ता पर्यावरण संवर्धक युवक ऐश्वर्य मांजरेकर हे ग्रीन योद्धा म्हणून यापुढे जिल्ह्या मध्ये काम करणार आहेत. त्यांनी याआधीही शासनाच्या वातावरण बदल, वृक्षारोपण, जलजागरण अभियान, सिंगल युज प्लास्टिक बंदी, शहरी व सागरी किनारा स्वच्छ्ता अभियान, माती संवर्धन, कमी करण्यासाठी उपक्रम राबवून त्यांनी योगदान दिले आहे.

### कासार्डे येथून दुचाकी चोरीस

**कणकवली । वार्ताहर**

मूळ जांभवडे (ता. कुडाळ) व सध्या कासार्डे येथे वास्तव्यास असलेल्या नीलेश लक्ष्मण शिंदे (४४) यांची हिरो स्प्लेंडर प्लस दुचाकी (एमएच ०७ एएन५९९७) अज्ञात चोरट्याने चोरली. नीलेश यांनी शनिवारी रात्री ९.३० वा. सुमारास कासार्डे तिठा येथील एका दुकानानजीक दुचाकी उभी केली. रात्री १२.१५ वा. सुमारास परत आलेल्या नीलेश यांनी पाहिले असता दुचाकी चोरीस गेली होती.


## कणकवली नगरपंचायत, कणकवली

तालुका-कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग

email:- kankavalinp@gmail.com

जावक क्र. कनपं / ५९२ /२०२४
दिनांक : ०८/०७/२०२४

### जाहीर लिलाव सूचना

१. तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील यादी प्रमाणे लिलाव करणेचा आहे. सदर लिलाव खाली नमूद केलेल्या नगरपंचायतीच्या आवारात दि. २२/०७/२०२४ रोजी ठीक ११.०० वाजता मुख्याधिकारी नगरपंचायत कणकवली यांचे समक्ष केला जाईल. तरी लिलावात भाग घेवू इच्छिणाऱ्यानी लिलावाच्या खाली नमूद केलेल्या शर्तीनुसार बोलावयाचे आहे.
२. लिलावा संबंधित अधिक माहिती कणकवली नगरपंचायत कार्यालयात वेळेत मिळू शकते.
३. लिलावात भाग घेणेपूर्वी दि. २२/०७/२०२४ रोजी ११.०० वाजेपर्यंत संबंधित इसमाने अनामत रक्कम म्हणून १००० /- (रुपये एक हजार मात्र ) कणकवली नगरपंचायत येथे भरणा करावी लागेल. ज्यांनी अनामत रक्कम भरणा केली असेल त्याच लोकांना लिलावात भाग घेता येईल.
४. लिलावाची अंतिम बोली मागणाऱ्या इसमाने लिलाव रक्कमेच्या २०% रक्कम लिलावाच्या ठिकाणी जमा करणे आवश्यक आहे.
५. कोणतेही कारण न देता लिलाव मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार खालील स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवणेत आलेला आहे.
६. लिलावात सामानाची जागेवरील सद्यस्थिती पाहूनच लिलावात भाग घ्यावा. त्यात काही शंका असल्यास त्या लिलावापूर्वी समजावून घ्याव्यात. मागाहून कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.
७. अंतिम बोली आदेशास मा.मुख्य अधिकारी यांची मंजुरी प्राप्त झालेनंतर उर्वरित ८०% रक्कम लिलाव घेणाऱ्या व्यक्तीकडून भरणा करून घेवून नंतरच निरूपयोगी साहित्य संबंधितांच्या ताब्यात देण्यात येईल.
८. त्यानंतर सदर निरूपयोगी साहित्य ०८ दिवसांचे आत संबंधितानी उचल करावयाचे आहे.

| अ.क्रं. | लिलावातील निरुपयोगी साहित्याचे वर्णन |
|---|---|
| १. | लोखंडी कचरा कुंड्या |
| २. | लोखंडी भंगार साहित्य |
| ३. | प्लास्टिक निरुपयोगी साहित्य |
| ४. | निरूपयोगी विद्युत साहित्य (ॲल्युमिनिअम) |
| ५. | निरूपयोगी विद्युत साहित्य (भिड्याचे) |

सही/- मुख्य अधिकारी
नगरपंचायत कणकवली
तालुका-कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग

# पर्यटन व्यावसायिकांना सिआरझेड व बिनशेती सारा दंडाची वसुलीच्या नोटिसा ; पर्यटन व्यावसायिक आक्रमक



**मालवण । वार्ताहर**

महसूल विभागाकडून पर्यटन व्यावसायिकांना सिआरझेड व बिनशेती सारा दंडाची वसुली करण्यासाठी नोटिसा बजावल्या आहेत. या अन्यायकारक नोटीसा रद्द करण्यात याव्यात. या प्रमुख मागणीसह मालवण तारकर्ली, देवबाग, वायरी येथील पर्यटन व्यावसायिकांनी मालवण तहसील कार्यालय येथे एकवटत निवेदनाच्या माध्यमातून अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. चुकीच्या पद्धतीने दंड नोटीसा बाजावून पर्यटन व्यावसायिकांना होणारा नाहक त्रास शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी पर्यटन व्यावसायिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. पर्यटन महासंघाचे अध्यक्ष विष्णू मोंडकर, तारकर्ली पर्यटन विकास संस्था अध्यक्ष सहदेव साळगांवकर यांनी महसूल नायब तहसीलदार श्रद्धा चौगुले यांना निवेदन दिले. यावेळी पर्यटन व्यावसायिक मिलिंद झाड, केदार झाड, राम चोपडेकर, मिथिलेश मिठबावकर, देवानंद लोकेगांवकर, मनोज खोबरेकर, मुन्ना झाड, दर्शन वेंगुर्लेकर, बाळू पडवळ, केदार झाड, दादा वेंगुर्लेकर, बबन तळवडेकर, मंदार गोवेकर, विकी लोके, अंजना सामंत, दत्तप्रसाद सामंत, हालेस डिसोजा, आनंद हडकर, अभय पाटकर, गणेश सातार्डेकर, जयवंत सावंत, राजेश गोसावी, प्रदीप गांवकर, हर्षल गंभीरराव, मयूर तारी, ओंकार हट्टीकर, लीलाधर झाड, धोंडी जाधव, दीपेश गोसावी, शिवा माडये, लक्ष्मीकांत तळवडेकर, अभिजित परब, रुपेश सातार्डेकर, निलेश करलकर, महेश मयेकर, प्रथमेश पुरलकर यांसह पर्यटन व्यावसायिक मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी देवानंद लोकेगावकर, विष्णु मोंडकर, सहदेव साळगावकर यांनी भुमिका मांडली. दंडात्मक नोटीसा या चुकीच्या पद्धतीने आहेत. आमच्या जागेत आम्ही रोजी रोटी म्हनुन पर्यटन व्यवसाय वाढवत आहोत. हा हंगामी व्यवसाय असून वर्षातील ८० दिवस चालतो. असे असताना चुकीचे नियम लावून दंड केला जात आहे. आम्ही दंड भरणार नाही ही आमची भुमिका ठाम आहे. आमची भुमिका वरिष्ठ स्तरावर पोहाचवा. असेही व्यवसायिकानी सांगितले.

देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे, महाराष्ट्र राज्य शासनाने २८ वर्षापूर्वी सिंधुदुर्ग जिल्हा हा भारतातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला. जिल्ह्यातील देवबाग तारकर्ली वायरी भूतनाथ ह्या गावातील स्थानिक भूमिपुत्रांनी शासनाच्या ह्या निर्णयाला सकारात्मक प्रतिसाद देत शासकीय मदतीची वाट न पाहता स्वतःच्या मेहनतीने या भागातील सागरी पर्यटन देशविदेशात पोचवले.

स्थानिक ग्रामस्थांनी आपल्या स्वतःच्या शेतजमिनी मध्ये निवास व न्याहारी पर्यटन सुरू केले आहे. पर्यटन विकासाच्या माध्यमातून स्थानिक भूमीपुत्रानी आर्थिक सबलतेचा मार्ग निवडला. महसूल खात्याने केंद्र शासनाच्या सीआरझेडच्या जाचक कायद्याचा उल्लेख करून नदी व समुद्रकिनारी स्वतःच्या राहत्या जागेत व्यवसाय करणाऱ्या पर्यटन पर्यटन प्रकल्पांवर कारवाईचा बडगा दाखवत जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम १७४ अन्वये दंड वसुलीची कार्यवाही केली जात आहे जी अन्यायकारक आहे. आतापर्यंत सर्व ठिकाणी शेतजमिनीचा वापर बिनशेती करण्यात आला असता शेत सारा वसुलीची नोटीस दिली जाते परंतु शासनाने बिनशेती कर व दंड वसुलीच्या नोटीसा दिलेल्या आहेत.

बिनशेती वापर अधिनियम १९६६ कलम १७४ प्रमाणे पर्यटन व्यावसायिकांवर होत असलेली कार्रवाई अयोग्य असल्याने आपण हा विषय जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे वर्ग करावा. आणि स्थानिक पर्यटन निवास न्याहारी धारकांवर होणारी कार्रवाई थांबवावी. नवीन ताज्या घटना दुरुस्ती सीआरझेडच्या अधिनियमानुसार समुद्राच्या कमाल भरतीरेषेपासून जमिनीकडील बाजूस ५० मीटरच्या सर्व बांधकामांना ९ मीटर उंचीपर्यंत ची बांधकामे बिनशेती बांधकाम म्हणून रीतसर असल्याचे प्रमाणित करावे.

स्थानिक भूमिपुत्र पर्यटन निवास न्याहारी धारकांचा बिनशेती वापर असल्यास शेतसाराप्रमाणे शुल्क आकारावे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ यांच्यातर्फे सभासद व्यावसायिक यांना महामंडळातर्फे अनेक सवलती दिल्या जातात जसे पाणी, विद्युत पुरवठा, रस्ते अनेक प्रकारचे परवाने कर, सवलती इत्यादी. त्याचधर्तीवर सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा घोषित केला असल्याने या जिल्ह्यातील समुद्र किनारपट्टीच्या समस्त पर्यटन निवास न्याहारी व्यावसायिकांना एमआयडीसी सारख्या सवलती उपलब्ध करण्यात याव्यात. तसेच जो पर्यत वरिष्ठ स्तरावरून न्याहरी निवास धारक स्थानिकांचा उल्लेख असलेला अध्यादेश अस्तित्वात येत नाही तोपर्यंत आपल्या कार्यालयातून महसुली अध्यादेशाचा चुकीचा वापर करून कर व दंड वसुलीची कार्यवाही त्वरित स्थगित करण्यात यावी व आपल्या स्थानिक भूमिपत्रांना सहकार्य करावे. असे निवेदन पत्रात म्हटले आहे.

## थोडक्यात



### शाळाबाह्य बालकांची शोधमोहीम हाती

**ओरोस । प्रतिनिधी**


जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक तसेच अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या मदतीने ५ जुलैपासून शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित बालकांचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे. ही मोहीम २० जुलैपर्यंत चालणार आहे. यासाठी बालकांच्या घरी, बसस्थानक, रेल्वेस्थानक, सार्वजनिक ठिकाणे, बाजारतळ, वीटभट्ट्या, दगडखाणी, साखर कारखाने, बालमजूर तसेच स्थलांतरित होऊन येणाऱ्या व जाणाऱ्या कुटुंबातून सर्वेक्षण करण्यात येणार आहे. माहिती निर्देशानुसार ०३ ते १८ वयोगटातील बालकांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना शिक्षण विभागातर्फे देण्यात आल्या आहेत.



### वेंगुर्ला तळवडे सावंतवाडी वाहतूक २६ तास ठप्प

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

होडावडे पुलावर पाणी आल्याने वेंगुर्ला सावंतवाडी वाहतूक २६ तास ठप्प गेले दोन दिवस बंद आहे. सतत दार पळत असलेल्या पावसामुळे होणारे पाळणा घोडावडे पुलावरील पाणी कमी होत नाही त्यामुळे सावंतवाडी तळवडे वेंगुरला वाहतो पूर्णपणे ठप्प झाली आहे या पुलाची उंची कमी असल्या मुळे या पुलावर वारंवार पाणी येत असते, काल मुसळधार पडत असलेल्या पावसामुळे काल बारा वाजल्यापासून या पुलावर पाणी आले आहे. आज दुपार पर्यंत पाणी कमी झाले नाही.तळवडे नदीपात्राला मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी आल्यामुळे या पुलावरून जाणारी वाहतूक सद्यस्थितीत बंद आहे. त्यामुळे वाहन चालक प्रवासी वर्ग नोकरवर्ग यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पुलाची उंची वाढवावी अशी मागणी प्रवासी वर्ग, व वाहन चालक, यांच्याकडून होताना दिसत आहे. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या पुलाची उंची वाढवण्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. हे पुल बाधूनबरीच वर्ष झाली आहे. त्यामुळे हे पुल नव्याने बांधणे गरजेचं आहे तसेच पुलाची उंची वाढवणे गरजेचे बनले आहे.



### मांडवी - राजिवडा धूप प्रतिबंधक बंधारा उधाणात वाहून जाण्याची भिती !

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

मुसळधार पावसासह रत्नागिरीत समुद्रालाही मोठे उधाण आले असून भरतीच्या उंच लाटा उसळत आहेत. राजिवडा - मांडवी धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरुन समुद्राचे पाणी लोकवस्तीत येत आहे. त्यातच अर्धवट स्थितीत असलेल्या चवंडेवठार येथील बंधाऱ्यावरुन समुद्राचे पाणी थेट वस्तीत घुसून धूपप्रतिबंधक बंधाराच वाहून जात जीवित सह वित्तहानी होण्याची भिती नागरिकांतून व्यक्त होत आहे. राजिवडा - मांडवी धूपप्रतिबंधक बंधाऱ्यावर चवंडेवठार येथे काही घरांजवळ बंधाराच घातला नसल्याने याठिकाणाहून समुद्राचे पाणी थेट वस्तीत घुसण्याची भिती नागरिक व्यक्त करित आहेत . अजून किमान दोन दिवस उंच लाटांसह समुद्राला उधाणाची भरती असणार आहे.

## आंबोली धबधब्यावर प्रशासनाची खबरदारी

**आंबोली । वार्ताहर**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात धुवांधार कोसळत असलेल्या पावसामुळे नदी नाल्यांना पूर आला असून आंबोलीत धबधब्यातील पाण्याचा प्रवाह वाढला आहे. वाढत्या प्रवाहामुळे आज येथील आलेल्या पर्यटकांना खबरदारी म्हणून खाली उतरविण्यात आले आणि प्रवेश बंद करण्यात आला. वेंगुर्ला बेळगाव मार्गावर माडखोल बाजारात चार फूट पाणी आल्याने येथील रस्ताही काही कालावधी साठी बंद होता. हवामान खात्याने आज सिंधदुर्गला दक्षतेचा 'रेड' अलर्ट दिला होता. हवामान खात्याचा हा अंदाज खरा ठरला आहे. सिंधुदुर्गात आज मोठ्या प्रमाणात पाऊस पडला असून अनेक ठिकाणी रस्त्यावर आणि तसेच बाजारात पाणी साचल्याने येथील नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले आहे. सावंतवाडी शहरातही मुसळधार पाऊस झाल्याने बाजारपेठ तसेच रस्ते पाण्याने भरले आहेत. खारबारदारी म्हणून शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. हवामान खात्याने पुढील चार दिवसांचा पावसाचा अंदाज जाहीर केला आहे. या अंदाजानुसार उद्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडणार असून त्यानंतर पावसाचा जोर ओसरणार आहे.



## चाफेलीत कॉजवे गेला वाहून ; ऐन पावसाळ्यात ग्रामस्थ अडचणीत



**कुडाळ । वार्ताहर**

तालुक्यात माणगांव खोर्यातील चाफेली काजरगोठणवाडी मुख्य रस्त्यावरील कॉजवेचा एक भाग निकृष्ठ कामामुळे रविवारी झालेल्या पुराच्या पाण्यात वाहुन गेला.

त्यामुळे येथील ग्रामस्थांची मोठी गैरसोय झाली आहे. ऐन पावसाळी मौसमात कॉजवे वाहून गेल्याने आता करायचे काय? असा प्रश्न येथील नागरीकांना पडला आहे.

गेले दोन दिवस माणगाव खोर्यातील सह्याद्रि पट्ट्यात मोठ्या प्रमाणात पर्जन्यदृष्टी झाली. त्यामुळे कर्ली नदिसह नाल्यांनाही मोठ्या प्रमाणात पाणी आले. या पाण्याच्या प्रवाहात चाफेली काजरगोठणवाडी रस्त्यावरील कॉजवेचे स्लॅप वाहून गेले. जिल्हा वार्षिक योजनेतून या कॉजवेचे काम काल भैरव मजुर सहकारी संस्था, कसालच्या माध्यमातून सुरू होते. जवळपास ९ लाख ४३ हजार ६२ रूपयाचे हे काम आहे. निकृष्ठ प्रतिच्या कामामुळे चाफेली येथील कॉजवे वाहून गेल्यानंतर सार्वजनिक बांधकाम उपअविभाग कुडाळचे उपअभियंता श्री. पिसाळ व शाखा अभियंता श्री. पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली. सदरच्या कामाची मुदत अद्यापही बाकी असून मुदतीत काम न झाल्यास ठेकेदारावर कारवाई केली जाईल असे सांगितले.

मात्र सद्यस्थितीत ग्रामस्थांच्या सुविधेबाबत तुम्ही काय करणार ? असा सवाल उपस्थित ग्रामस्थांनी केला. त्यावर मात्र बांधकामच्या या दोन्ही अधिकार्यांनी बोलण्याचे टाळले असल्याचे ग्रामस्थ अजय सावंत यांनी सांगितले.



## जुनाबाजार येथे आढळलेल्या अजगराला युवकांकडून जीवदान

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

येथील जुनाबाजार-करोलवाडा परिसरात अंगणात आलेल्या १० फुटी अजगराला तेथील स्थानिक युवकांनी पकडून सुखरूप नैसर्गिक अधिवासात सोडले.काल रात्री तो येथील नागरिकांना तो दिसला. त्याला पाहताच नागरिकांची तारांबळ उडाली. यावेळी रिझवान शेख, आरिफ करोल, शैबाज शेख या युवकांनी त्या अजगराला पकडून सुखरूप नैसर्गिक अधिवासात सोडले.

## बांदा-आळवाडी येथे मगरीला जीवदान

**बांदा । वार्ताहर**



येथील आळवाडी येथे तेरेखोल नदीपात्रानजीक रस्त्यावर आढळलेल्या साडेसहा फूट लांबीच्या मगरीला स्थानिक युवकांनी पकडून नैसर्गिक अधिवासात सोडले. तेरेखोल नदीला आलेल्या पुराच्या पाण्याने वाहत येऊन ही मगर याठिकाणी आल्याचे स्थानिकांनी सांगितले. ठाकरे शिवसेनेच्या अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष रियाज खान यांच्या दृष्टीस ही मगर पडली. त्यानंतर त्यानी याची कल्पना इतरांना दिली. रियाज खान, साई सावंत, मुरारी सावंत, ओंकार बांदेकर यांनी या मगरीला पकडून नैसर्गिक अधिवासात सोडले. तेरेखोल नदीत मगरिंची संख्या लक्षणीय असून पावसाच्या पाण्याने या मगरी नजिकच्या वस्तीत येत आहेत.

## आरवली टांक सागरतीर्थ समुद्रकिनारी धूप होऊन घरांना धोका

**सागरतीर्थ । वार्ताहर**

दरवर्षीप्रमाणे या पावसाळी हंगामात सागरतीर्थ समुद्र किनारी समुद्री लांटाच्या तडाख्याने वाळूची प्रचंड धूप होऊन स्थानिक रहिवाशांच्या घरांना धोका निर्माण झालेला आहे त्याचप्रमाणे माड बागायतीत पाणी घुसून बागायती नष्ट होण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे,

धूप प्रतिबंध बंधाऱ्यांची वारंवार मागणी करूनही संबंधित विभागाकडून यावर आतापर्यंत कोणतीही उपाय योजना केलेली नसल्याने स्थानिक २०० ते २५० घरांना धोका निर्माण झालेला आहे. स्थानिक रहिवाशांत यामुळे प्रचंड रोष निर्माण झाल्याने सागरतीर्थ येथील भाजप पदाधिकारी व मच्छिमार नेते देवेंद्र उर्फ बाळू वस्त यांनी सद्य परिस्थिती भाजप वेंगुर्ला तालुका अध्यक्ष सुहास गवंडळकर यांच्या निदर्शनास आणून दिले असता त्यांच्या सूचनेनुसार भाजप जिल्हा कार्यकारिणी सदस्य तथा मच्छिमार नेते वसंत तांडेल यांच्या नेतृत्वात भाजप पदाधिकारी व स्थानिक रहिवाशांनी आक्रमक पवित्रा घेत संबंधीत विभाग अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेण्यास भाग पाडले. यावेळी सहा.पत्तन अभियंता पत्तन उपविभाग वेंगुर्ला अधिकारी श्री व्ही.आर.वसावे(अति. कार्यभार), श्री.ए.एस. सुर्यागण (कनिष्ठ अभियंता), श्री.एस.बी.गवळी(कनिष्ठ अभियंता), श्री.पी.आर. गावडे, श्री.शिंदे.व्ही.के, श्री चौगुले नानासो,(स्थापत्य अधि. सहाय्यक), श्री.आर.व्ही.जाधव यांनी आरवली टांक सागरतीर्थ येथील समुद्र किनारी प्रत्यक्ष जागेवर जावून परिस्थिती चा आढावा घेतला.



समुद्री लाटांच्या तडाख्या मुळे किनाऱ्याची मोठ्या प्रमाणात धूप होऊन पाणी रहिवाशांच्या जागेत घुसत असल्याने २०० ते २५० राहात्या घराना तसेच बागायतींना वाळूची धूप होऊन धोका निर्माण झालेला आहे त्यामुळे संबंधीत विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कायमस्वरूपी धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याची मागणी भाजप पदाधिकारी व स्थानिक ग्रामस्थांनी उपस्थित अधिकाऱ्यांकडे केली असता यावर तात्पुरता आपत्कालीन तोडगा काढण्यात येईल असे आश्वासन दिले.

यावेळी भाजप पदाधिकारी श्री वसंत तांडेल सहित भाजप पदाधिकारी देवेंद्र उर्फ बाळू वस्त, सचिन वस्त ,सचिन मंत्री,कविता मंत्री, आकाश वेलंणकर, प्रकाश गावकर, तसेच सूर्यकांत गावकर, उदय मंत्री, मधुकर मंत्री,विजय मंत्री ई. ग्रामस्थ उपस्थित होते. स्थानिक ग्रामस्थ कायम स्वरूपी बंधाऱ्याच्या मागणीवर ठाम राहिल्यामुळे भाजप जिल्हा पदाधिकारी श्री वसंत तांडेल यांनी मा. जिल्हाधिकारी यांच्या निर्दशनास सदर बाब आणून समवेत जिल्हा व तालुका पत्तन अधिकार व यांची स्थानिक ग्राम स्थ,भाजप नेते यांची एकत्रीत मिटिंग लावून यावर कायम स्वरूपी तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल असे स्थानिक ग्रामस्थांना आश्वासन दिले.

## भारतीय क्रिकेटपटू झहीर खानने पिकलबॉलवरील अहवालाचे केले अनावरण

**मुंबई । प्रतिनिधी**

कृशांग स्पोर्ट्सने पिकलबॉलः द डेव्हलपमेंट रोडमॅप फॉर इंडिया या शीर्षकाचा आपला ताजा अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल आयआयएसएम (आंतरराष्ट्रीय क्रीडा आणि व्यवस्थापन संस्था) आणि एआयपीए (ऑल इंडिया पिकलबॉल असोसिएशन) यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे. हा अहवाल खेळाबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करतो आणि खेळाचा विकास करण्यासाठी फ्रेमवर्क विस्तृत करतो.

भारतीय क्रिकेटचे दिग्गज माजी वेगवान गोलंदाज झहीर खान, आयआयएसएमचे संस्थापक संचालक नीलेश कुलकर्णी आणि आमदार अ‍ॅड पराग अळवणी यांच्या हस्ते या अहवालाचे लोकार्पण करण्यात आले. इतर मान्यवरांसोबत प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे विश्वस्त श्री राजू रावल, मकरंद येडुरकर तसेच प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे व आंतरराष्ट्रीय पिकलबॉल असोसिएशन अध्यक्ष मा.श्री. अरविंद प्रभू हे ही उपस्थित होते.



पिकलबॉल हे टेनिस, टेबल टेनिस आणि बॅडमिंटनचे संयोजन आहे. हा एक मनोरंजक खेळ आहे जो भारतात लोकप्रिय होत आहे. हा क्रिशांग स्पोर्ट्सचा एक अनोखा उपक्रम आहे, ज्यात पिकलबॉल वेगाने वाढत असून त्यावर प्रकाश टाकणे आवश्यक होते आणि अहवालात अधोरेखित केलेल्या विकास आराखड्यामुळे राज्य आणि जिल्हा घटकांना त्याचा फायदा होईल. कृष्णांग स्पोर्ट्सचे संस्थापक मेहूल रावल यांनी ही माहिती दिली. विदर्भ पिकलबॉल असोसिएशनचे अध्यक्ष श्रेयांश मोहता यांनी सांगितले की, हा महत्त्वाचा अहवाल आहे, त्याचा आम्हाला फायदा होईल.

ज्ञानाचा अहवाल पार्श्वभूमी, कल अधोरेखित करतो आणि खेळाच्या भविष्यातील संभाव्यतेचे परीक्षण करतो. ही एक महत्त्वाची घटना होती कारण भारतात पिकलबॉल खेळाचा अहवाल प्रथमच प्रसिद्ध करण्यात आला होता. भारतीय क्रिकेटपटू झहीर खान पिकलबॉलवरील अहवाल सादर करण्याच्या विक्रमासह सुरुवात करताना मला खूप सन्मान वाटतो. हा कार्यक्रम नुकताच प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुल येथे पार पडला.

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) With CGPA 3.52
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**

**एम.बी.ए. (Distance) करिता प्रवेशाची सुवर्णसंधी**

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता एम.बी.ए. (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाकरिता आवश्यक असणाऱ्या प्रवेश परिक्षेसाठी (Entrance Exam) रिक्त जागांकरिता ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहे. त्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **गुरुवार, दि.१८ जुलै,२०२४** आहे.

**फेर प्रवेश परीक्षा- रविवार, दि. २१ जुलै, २०२४**

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासन अथवा भारत सरकारच्या कोणत्याही सांविधानिक संस्था किंवा ATMA तर्फे घेतल्या जाणाऱ्या व्यवस्थापन (Management) विषयात शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी घेण्यात आलेली प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेले आहेत ; अशा विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाच्या 'एम.बी.ए. (Distance)' अभ्यासक्रमाला थेट प्रवेश घेण्याकरिता आवाहन करण्यात येत आहे. अशा पात्र विद्यार्थ्याना शिवाजी विद्यापीठातर्फे वरीलप्रमाणे घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट लागू नसेल याची नोंद घ्यावी. तरी सदरच्या प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा.

तसेच याबाबतची सविस्तर माहिती व सुचना https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx या संकेतस्थळावर पहावी.

**फेर प्रवेश परीक्षेस अर्ज करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा...**

ठिकाण: कोल्हापूर
दिनांक : ०९/०७/२०२४
जा.क्र. सीडीओई/१०२३

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
**कुलसचिव**